# छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९३४
वर्ष १३ अंक ३
मूल्य रुपये पंधरा

विद्यार्थी विशेषांक



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

**जगाच्या सफरीवर जायला आवडेल?? पण जाताना एक गोष्ट मात्र लक्षात ठेवा बरं का! तुम्ही फ त 'सर्वात मोठ्या खंडापासून सर्वात छोट्या खंडापर्यंत' असाच प्रवास करू शकता. तुम्हाला मदत म्हणून खंडांच्या आकारमानानुसार काही लृप्त्या दिल्या आहेत. चला निघा प्रवासाला...**

१) सर्वात जुन्या तीन वसाहतींचा जन्म जिथे, सर्वात उंच पर्वतरांगा आहेत तिथे!

२) विषुववृत्त व मूळ रेखावृत्त दोन्ही येथून जातात, सर्वात जास्त देश येथे सापडतात!

३) आहे दूर पश्चिमेला पण म्हणतात मात्र उत्तरेतला, रॉकी व अॅपालॅचिअन पर्वतरांगांचा वारसा लाभलेला !


४) डावी-उजवीकडून अटलांटिक-प्रशांत महासागराने घेरलेला, माया, इंका या वसाहतींचा जन्मही इथला!

५) पांढरे शुभ्र बर्फ जिथे, चारही बाजूंनी दक्षिण महासागराने घेरले!

६) दोन मोठ्या खंडांमध्ये विराजमान झालेला, अन् श्रीमंत इतिहास लाभलेला!

७) तीव्र उन्हाळा अन् तीव्र थंडी, प्रशांत महासागरापाशी कांगारूंची गर्दी!

## मार्गशोधा



**संकल्पना, निर्मिती – कु. पल्लवी गाडगीळ**

विद्यार्थी विशेषांक

# छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९३४। वर्ष १३ अंक ३

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २४५ वा अंक, वर्ष २१ अंक ५

प्रकाशन दिनांक – १० अग्रहायण, शके १९३४/१ डिसेंबर २०१२

ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## • अंतरंग •


| | | |
|---|---|---|
| २. | **संवाद** | – महेन्द्र सेठिया |
| | **मनोगत** | – कु. पल्लवी गाडगीळ |
| ३. | कथा... **मिशन पॅरिस** | – कु. अंकिता आपटे |
| ६. | कविता... **एकच पान** | – चि. मल्हार अत्रे |
| ७. | अनुभवपर...**माझ्या सुवर्णपदकाचा प्रवास...** | – चि. प्रेमराज चव्हाण |
| ९. | चित्रकथा... **डिटेक्टिव नंदू** | – चि. प्रणव कोठावळे |
| १४. | कोडे... **येशूच्या मूर्तीचे रहस्य** | – चि. निषाद पटवर्धन |
| १६. | प्रवासवर्णन... **धरतीवरील स्वर्ग** | – कु. भावना कुंजीर |
| १९. | संस्था परिचय ... **सेवाभावी संस्था :** | – कु. वैष्णवी सुभेदार |
| | **रामकृष्ण मठ, पुणे** | – कु. सृष्टी प्रधान |
| २२. | विज्ञान प्रयोग... **द्रवरूपी इंद्रधनुष्य** | – संकलन |
| २३. | व्यक्तिपरिचय... **चावरे आजी** | – कु. गौतमी कुलकर्णी |
| २५. | ललित... **क्षण निर्णयाचा !** | – कु. उन्मेषा काळे |
| २६. | कविता... **कवीजवळ असते** | – कु. अपूर्वा कारंडे |
| | **ते रान...** | – कु. भार्गवी केन्हाळकर |
| २७. | प्रवासवर्णन... **गोष्ट एका सुवर्णयुगाची!!** | – कु. देवश्री खरे |
| ३०. | पत्रलेखन... **प्रिय ताईस...** | – कु. जपा फडके |
| ३२. | **माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'** | |

**याशिवाय –** करून तर पाहा , ओळखा पाहू कोण? (१५),
छात्र प्रबोधन दिवाळी अंकाविषयी बोल या प्रतिक्रिया (१८)
**पद्य... कथा ही विवेकानंदांची** (मलपृष्ठाच्या आतील पानावर) –कै. रवींद्र भट


**मुखपृष्ठाविषयी –** पिंपळ पान वहीत ठेऊन तयार झालेल्या जाळीदार पिंपळपानावरती पोस्टर कलरच्या माध्यमातून मनोहारी निसर्गचित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. पिंपळपानावरती चित्र काढण्याचा एक वेगळा प्रयोग मी करून बघितला.

**– चि. नितीन अवसरमल** (इ. ९ वी)
माध्यमिक विद्यालय, फुगेवाडी, पुणे 411012

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**विद्यार्थी संपादक**
कु. पल्लवी गाडगीळ

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

**मुखपृष्ठ –** चि. नितीन अवसरमल, पुणे

**मासिकाची वर्गणी**
**वार्षिक : ₹ १८०/**
**द्वैवार्षिक : ₹ ३४०/**
**त्रैवार्षिक : ₹ ५००/**
**दशवार्षिक : ₹ १,५००/**

**या अंकाची किंमत : ₹ १५/–**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी –
₹ २०/– जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी–
प्रतिवर्षी ₹४०/– जादा

**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org
**ई–मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.**



**जम्मु व काश्मीर – जम्मु** (हिवाळी), **श्रीनगर** (उन्हाळी)
**भाषा – काश्मीरी, उर्दू, डोंगरी, स्थापना – २६ ऑक्टो. १९४७**

## संवाद

**लिहू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,**

*'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक वाचून झाला का? त्यातलं काय काय आवडलं ? अंकातली भेट तयार करून घरात दर्शनी भागात ठेवली ना? अंकातील 'निर्णयातील स्वावलंबन' हा विभाग कसा वाटला? त्या आधारे स्वत:चे छोटे-मोठे निर्णय अधिक योग्यरितीने घ्यायचा आवर्जून प्रयत्न करा. त्यात काही अडचणी आल्या तर जरूर विचारा. अंकातील आवडलेल्या लेखांच्या लेखकांना पत्र लिहायचा कंटाळा करु नका. २/३ जणांना तरी नक्की पत्र पाठवा आणि अर्थातच एकूण अंकाबाबतच्या प्रतिक्रिया आमच्याकडेही लिहून पाठवायच्या आहेत बरं का ! त्यातून लेखकांचा अन आमचाही उत्साह, आनंद वाढत असतो.*

*हल्ली बहुतेक विद्यार्थ्यांचं लेखन अभ्यासापुरतं, गृहपाठ-परीक्षा-स्पर्धा यांपुरतंच मर्यादित झालेलं दिसतंय अन् तेही बक्षिसासाठी... मार्कांसाठी... वा शिक्षा टाळण्यासाठी नाईलाजाने केलेलं! पण स्वत:हून, स्वत:ला जे मनापासून वाटतं ते कागदावर लिहायचा कधी प्रयत्न केलाय? कधी ते दैनंदिनीच्या रूपात तर कधी पत्ररूपात असेल. कधी एखादं प्रवासाचं-स्थळाचं-निसर्गाचं वर्णन असेल तर कधी एखादा खोलवर स्पर्शून गेलेला प्रसंग असेल. कधी ठसा उमटलेली, मनात घर करून राहिलेली व्यक्ती अथवा पुस्तक असेल तर कधी एखाद्या कलाकृतीला प्रतिसाद देणं असेल. लिहावंसं वाटतं ना तुम्हाला? पण मग काय होतं?... बहुतेकवेळा आपण कंटाळा करतो. लिहायला घेतलं की हवंतसं कागदावर उमटतंच असं नाही. कधीकधी योग्य शब्द आठवत नाहीत. सुरुवात कशी करावी इथेच गाडी अडते. असं होतं का तुमचं? मी समजू शकतो लेखनातले हे अडथळे; कारण माझ्याही लेखनाची सुरुवात अशीच अडखळत, धडपडतच झाली.*

*स्वत:ला जे आतून वाटतं ते व्यक्त करण्याचं लेखन हे एक प्रभावी माध्यम आहे. तेव्हा तुम्हीही आळस बाजूला ठेऊन, या माध्यमाशी दोस्ती करायचा प्रयत्न करा. तुम्हाला ते निश्चितच जमेल. त्यासाठी तुम्हाला मनापासून शुभेच्छा! ज्यांनी अशी लेखनाशी दोस्ती केली त्या मुलामुलींच्या साहित्यकृतीतून छात्र प्रबोधनचा हा 'विद्यार्थी विशेषांक' सिद्ध झालाय. सर्व लेखक व चित्रकार विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक! बारावीत असूनही अत्यंत चिकाटीने कु. पल्लवीने या अंकाचे संपादन करून तो पूर्णत्वास नेला म्हणून तिचे विशेष कौतुक!*

*'तुम्हीच संपादक व्हा' या स्पर्धेत सहभागी होताय ना? तपशील अंकात व संकेतस्थळावर!*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

## मनोगत


*स्वामी विवेकानंद यांची दीडशेवी जयंती, ज्ञान प्रबोधिनीचे 'सुवर्ण महोत्सवी वर्ष', छात्र प्रबोधनचे 'द्विदशकपूर्ती वर्ष' आणि २०१२ हे 'राष्ट्रीय गणित वर्ष' अशा 'वर्ष-विशेषा'मध्ये मला विद्यार्थी विशेषांकाचं संपादन करायला मिळालं, ही एक मोठी पर्वणीच!*

*हीच संधी साधून 'जास्तीत जास्त प्रकारचे आणि विविध विषय हाताळले जातील असे साहित्य आपल्याला देता येईल का?' असा विचार झाला. या सर्व प्रक्रियेत मला खूप काही शिकायला मिळाले. कोणताही लेख हा केवळ त्यातील मजकुराने पूर्ण होत नाही, तर त्यासाठी लेखानुरूप चित्र, लेखाचा सारांश वा हेतू सांगण्यासाठी ठळक मजकुराची मांडणी... या आणि अशा बऱ्याच गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. आणि त्याचबरोबर 'आपल्याला अपेक्षित असलेला आशय लेखातून मांडला गेला आहे ना', 'त्यातील शुद्धलेखन तपासले गेले आहे का?' ह्या गोष्टीदेखील विसरून चालत नाहीत.*

*हे सर्व करत असतानाच अभ्यास, कॉलेजचे वेळापत्रक, मासिकासाठी असलेले वेळेचे बंधन सांभाळताना थोडं कठीण गेलं खरं; पण त्यातही एक वेगळीच मजा जाणवत होती. कारण आपण करत असलेले काम नक्कीच 'भारी' आहे, हे कळत होतं. अशा सगळ्या धडपडीतून झालेल्या या अंकाबद्दल आपल्या सगळ्यांच्या प्रतिक्रियांची मी उत्सुकतेनं वाट पाहत आहे...*

**– कु. पल्लवी गाडगीळ** (इ. १२वी), पुणे

**(विद्यार्थी संपादक)**



आसाम - दिसपूर
भाषा - आसामी, स्थापना - १५ ऑगस्ट १९४७

# मिशन पॅरिस

– कु. अंकिता आपटे



४ मे २०१२. पूर्वाची दहावीची परीक्षा संपून सुट्टी लागली होती. पूर्वा अगदी मजेत बसून टी.व्ही. बघत होती. इत यात दरवाजा वाजला. 'केळकर, पोस्ट आलंय', अशी पोस्टमन मामांची आरोळीही ऐकू आली. एरवी ही आरोळी ऐकून धावतपळत बाहेर येणारी पूर्वा आज अजिबातच उत्साहित झाली नाही. कारण दहावीच्या गडबडीत पूर्वाबाईंचं पत्रव्यवहाराचं मिशन तात्पुरतं स्थगित झालं होतं. मग जर पत्रंच पाठवली नाहीत तर उत्तरं तरी कुणाची येणार! तेव्हा काहीशी कंटाळूनच पूर्वा बाहेर आली. दारात पडलेलं पत्र आणि त्याच्याबरोबर आलेली दोन-तीन मासिकं हे सगळं उचलून तिनं सरळ आजोबांच्या खोलीत नेऊन ठेवलं आणि आजोबांना वर्दीही दिली,

'आजोबा, तुमची मासिकं आली आहेत'.

बाहेर येऊन ती पुन्हा टी.व्ही.समोर बसायचा अवकाश, आजोबांनी पूर्वाला हाक मारली,

''पूर्वा, ए पूर्वाराणी, अगं, हे पत्र तुझं आहे. माझ्याकडे कसं आलं?''

''माझ्याकरता पत्र? मला कुणी लिहिलंय पत्र?'' असं म्हणत पूर्वानं पत्र वाचायला सुरुवात केली.

Dear Poorva,

Heard about your interesting hobby of letter writing from my dear friend Mr. Rudolth Beckebauer. I am writing this letter to invite you to a World Children's Literary Conference to be held in the month of December in Paris, France. I want to address the student delegates about your wonderful hobby of letter writing which is on the verge of extinction. Please confirm about your presence so that further procedures can be taken care of.


With love,
Caroline Smith

''कॅरोलिन स्मिथ म्हणजे इंग्लिशमधल्या जगप्रसिध्द बाललेखिका ! त्यांनी मला पत्र लिहिलंय, मला? च क पॅरिसला बोलवलंय?''


पूर्वाबाई मनाने विमानात बसून पॅरिसला पोहोचल्यासुद्धा! पण सध्याच्या जगात मात्र, या घटनेला अजून पाच-सहा महिने बाकी होते. हे लक्षात आल्यावर पूर्वाने आईच्या नावाने पुकारा सुरू

*काय मित्रांनो, मागील विद्यार्थी विशेषांकात (सौर श्रावण, शके १९३३) रुडॉल्फ बेक्केनबोवरसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या इतिहास संशोधकाला आपल्या शाळेत आणणारी पूर्वा केळकर आठवतीये ना?*

*तिच्यासारखंच 'मिशन पत्रव्यवहार' तुम्हीही चालू केला असेल; पण पूर्वाला मात्र पहिलं पत्र नक्की लिहा बरं का, अभिनंदन करण्यासाठी! अहो, का म्हणून काय विचारताय? ती आता जाणार आहे ना! विमानात बसून!! भुर्रऽऽऽऽऽ!!! थेट परदेशात!!!! कशासाठी? वाचा, वाचा..... कळेल!*



ओरिसा - भुवनेश्वर
भाषा - ओरिया, स्थापना - १९ ऑगस्ट १९४९



केला, ''आई, ए आई, हे बघ मला कुणाचं पत्र आलंय! कॅरोलिन स्मिथचं!! त्यांनी मला पॅरिसला बोलावलंय. तिथल्या साहित्यसंमेलनात पत्रलेखनाबद्दल बोलण्यासाठी!!! वॉव!!! ए आई, लवकर ये ना गं!''पत्र वाचून आईलाही खूपच आनंद झाला. बाबांनी तर दिवसभर फोनजवळ बसून सगळ्या मित्रमंडळींना, नातेवाईकांना ही बातमी देऊनसुद्धा टाकली.

याच आनंदात दहावीचा निकाल, कॉलेजची निवड, ॲडमिशन हे सगळं पार पडलं. पूर्वाच्या कॉलेजचा पहिला दिवस उजाडला. त्या दिवशी आई, बाबा आणि पूर्वा तिघंही कॉलेजमध्ये गेले, साहित्य संमेलनासाठी फ्रान्सला जाण्याची परवानगी प्राचार्यांकडून घेण्यासाठी! पूर्वाच्या मनात थोडी धाकधूक होतीच; कारण तिचा कॉलेजचा आज पहिलाच दिवस होता आणि त्या पहिल्याच दिवशी ती परदेशी जाण्यासाठी प्राचार्यांकडे परवानगी मागणार होती. प्राचार्या रानडे मॅडम फारच 'हटके' निघाल्या. त्यांनी परवानगी तर दिलीच; पण पूर्वानं कोणाकोणाला पत्रं लिहिली, त्यातल्या कोणाकोणाची उत्तरं आली, हे सगळं काही तिला विचारून घेतलं. शिवाय पॅरिसहून स्वत:साठी मोनालिसाचं जगप्रसिद्ध चित्र आणायलाही त्यांनी पूर्वाला सांगितलं.

पूर्वा कॉलेजला जायला लागली. लगेचच तिचा चार-पाच जणांचा मस्त गट जमला. या गटाला पूर्वाच्या भावी परदेशवारीबद्दल कळल्यावर ही बातमी कॉलेजभर पसरली आणि पूर्वाकडे पॅरिसहून तिच्या मैत्रिणींनी आणायला सांगितलेल्या वस्तूंची भलीमोठ्ठी यादीच तयार झाली. कुणी तिला कॅरोलिन स्मिथची स्वाक्षरी, कुणी त्यांची पुस्तकं, कुणी तिकडची चलनी नाणी, इत्यादी अनेक गोष्टी आणायला सांगितल्या होत्या. मधल्या काळात तिला कॅरोलिन स्मिथचं आणखी एक पत्र आलं. त्यातून पत्रासोबत विमानाची तीन तिकीटं आणि कार्यक्रमपत्रिकाही बाहेर आली. त्या कार्यक्रमपत्रिकेत सुरुवातीला एक ओळ होती,

'First session- First speaker- Miss Poorva Kelkar, India, Topic- The Wonderful World Of Letter Writing' ती वाचून पूर्वाला हवेतच तरंगत असल्यासारखं वाटायला लागलं.

पण त्या हवेतून ती लगेचच जमिनीवरही आली. कारण दुसऱ्या एखाद्या देशात जाऊन, तिथे जमलेल्या लहान लहान मुलांसमोर आपल्या छंदाबद्दल त्यांना कंटाळा न येऊ देता बोलणं, हे काही सोपं काम नव्हतं. पण आईने तिची अगदी मस्त तयारी करून घेतली. अखेर तो दिवस उजाडला.

पूर्वा, आई आणि बाबा या तिघांना घेऊन फ्रान्सच्या विमानानं आकाशात झेप घेतली आणि हां हां म्हणता ते पॅरिसला पोहोचलंही! दुसऱ्याच दिवशी पूर्वाचं भाषण होतं. हॉटेलवर





उत्तर प्रदेश - लखनऊ
भाषा - हिंदी, उर्दु, स्थापना - २६ जानेवारी १९५०

येऊन उद्याच्या दिवसाची वाट बघत बघत ती रात्री चटकन झोपून गेली.

दुसऱ्या दिवशी पूर्वा संमेलनाच्या जागी पोहोचली. त्या भव्य अशा सभागृहात शिरताच प्रत्यक्ष कॅरोलिन स्मिथ तिला सामोऱ्या आल्या. पूर्वाचा क्षणभर आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. असंख्य सुंदर सुंदर पुस्तकांवर लेखिकेच्या छायाचित्राच्या जागी दिसणारा तो चेहरा आज साक्षात तिच्यासमोर तिला दिसत होता. त्याच आनंदात ती आत आली आणि तिथे तिला अजून एक आनंदाचा झटका बसला. कॅरोलिन स्मिथनी तिची ओळख फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष फ्रॅन्कॉइस होलांड यांच्याशी करून दिली. सर फ्रॅन्कॉइसनी देखील जराही शिष्टपणा न करता तिला शेकहँड केला.

कार्यक्रम अगदी ठरलेल्या वेळी सुरू झाला आणि पहिलं भाषण पूर्वाचंच होतं. तिनं आपल्या भाषणात आपल्याला पत्रं लिहिण्याचा हा छंद कसा जडला, आपण पहिलीत असताना राजीव तांबेंना कसं पत्र लिहिलं आणि त्यांचं उत्तरही आपल्याला कसं आलं. आजपर्यंत आपण कोणाकोणाला पत्रं लिहिली. त्यातल्या कोणाकोणाची आपल्याला उत्तरं आली हे सगळं अतिशय रंजक आणि गंमतीदारपणे मुलांना सांगितलं. मुलांनीही वेळोवेळी हसून टाळ्या वाजवून तिला अतिशय उत्तम प्रतिसाद दिला.

शेवटी पूर्वा म्हणाली,

"I don't know about your country but in India, letter writing is confined only to exams to get the stipulated two-three marks. The subject of the letter is also typical. In a lighter vein, I must say that I am afraid that if this present trend continues, the postal department will have to open a gym in every post office to keep their postmen fit and active. So please continue this hobby of letter writting and give every letter that personal and special touch. Thank you, one and all."

एवढं बोलून टाळ्यांच्या प्रचंड गजरात ती व्यासपीठावरून खाली उतरली. इतर सगळे कार्यक्रमही व्यवस्थित पार पडले आणि ती सर्वांचा निरोप घेऊन सभागृहाच्या बाहेर पडणार इत यात फ्रॅन्कॉइस होलांड तिच्याजवळ आले आणि, "I will be very happy to receive a sweet letter from you, with that personal and special touch my dear friend," असं म्हणून ते छानसं हसले.

पुढचे दोन दिवस तिने फ्रान्समधल्या ख्रिसमसचा अगदी मनसो त आनंद लुटला. सगळ्या वस्तू खरेदी केल्या. पण अजूनही कॅरोलिन स्मिथनी तिला परतीचं तिकिट दिलं नव्हतं. तेव्हा परत कधी जायचं या विचारात ते तिघं होते. आणि अचानक त्यांच्या खोलीचं दार वाजलं. पूर्वाने दार उघडलं आणि ती बघतच राहिली. तिचे मित्र रुडॉल्फ बे केनबोवर तिला भेटायला आले होते! त्यांनी आत येताच तिच्या हातात एक पाकीट ठेवलं. तिने ते पाकीट उघडून पाहिलं. उद्याच्या जर्मनीच्या विमानाची तिकीटं होती त्यात!! रूडॉल्फ तिला म्हणाले, "You have seen Paris, now let's go to my country my dear friend!" हे ऐकून ती उडालीच आणि मनोमन जर्मनीची स्वप्नं बघू लागली.

काय मग मित्रांनो? कशी काय वाटली पूर्वाची परदेशवारी? आवडली की नाही? पूर्वाच्या या परदेशवारीबद्दल तुम्हाला काय वाटलं, ते मला कळवाल ना? हां हां... पण ते पत्र लिहूनच बरं कां! कोणी सांगावं, उद्या तुम्हालाही एखाद्या परदेशवारीला जाण्याची संधी मिळेल!


***

**– कु. अंकिता आपटे**
'समाधान', प्लॉट नं. ८४, राणी चन्नमा नगर, सेकंड स्टेज, बेळगाव 590006
**चित्रकार – कु. अंकिता दीक्षित**



बिहार - पटणा
भाषा - हिंदी, संथाली, स्थापना - २६ जानेवारी १९५०

# एकच पान



त्या निष्पर्ण झाडावर उरलं होतं एकच पान...
शिशिराचा अंत पाहात, वसंताचे गात गुणगान,
उरलं होतं एकच पान...


फांदीचं होतं ते भलतंच लाडकं,
तसं होतंच कोण दुसरं म्हणायला दोडकं?
घेऊन बसायची त्याला कवेत,
भाकायची करुणा त्याच्या समवेत...
त्या निष्पर्ण झाडावर उरलं होतं एकच पान...
शिशिराचा अंत पाहात, वसंताचे गात गुणगान,
उरलं होतं एकच पान...

एकटंच होतं शिशिराचे दिवस मोजत,
बाकी सगळेच पडले होते खाली कुजत
त्याच्या मनात होती नव्या पहाटेची उमेद
त्याला ती सोडून द्यायची नव्हती हवेत...
त्या निष्पर्ण झाडावर उरलं होतं एकच पान...
शिशिराचा अंत पाहात, वसंताचे गात गुणगान,
उरलं होतं एकच पान...

इत यात एक वावटळ आली
पानाची भलतीच धावपळ उडाली
झाडावरून पानाला गाळून
वावटळ गेली तिथून निघून
त्या निष्पर्ण झाडावर उरलं नव्हतं एकही पान...
शिशिराचा अंत पाहात, वसंताचे गात गुणगान,
उरलं नव्हतंच एकही पान...

इत यात पानाला झाला एक उबदार स्पर्श
ज्यामुळे झाला त्याला भलताच हर्ष
म्हणाले अखेर मी पाहिलाच
माझ्या बाळपणीचा वसंत...

**– चि. मल्हार अत्रे** (इ. ११ वी)
आय ५, शिक्षक निवास, पुणे विद्यापीठ आवार, गणेशखिंड रस्ता, पुणे 411007
**चित्रकार : कु. प्राज ता कुंभार**




**मध्यप्रदेश - भोपाळ**
**भाषा - हिंदी, स्थापना - १ नोव्हेंबर १९५६**


दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

# माझ्या सुवर्णपदकाचा प्रवास...

**– चि. प्रेमराज चव्हाण**




***इयत्ता नववीचं शैक्षणिक वर्ष सुरू झालं; माझ्या डोक्यात सारखा तोच विचार घुमत होता. मग काय? मी थेट आमच्या शाळेची स्टाफरूम गाठली अन् आमच्या विज्ञान शिक्षिका सौ. बी. एस. माने मॅडम यांना माझा विचार सांगितला...***

---

इयत्ता नववीत खऱ्या अर्थानं माझ्या जीवनाला कलाटणी देणारी एक गोष्ट माझ्या आयुष्यात घडली. तोच हा सुंदर आणि अविस्मरणीय अनुभव मी तुमच्याशी 'share' करतोय!

असं म्हटलं जातं, की या सबंध पृथ्वीतलावर यशप्राप्तीसाठी झगडणारा माणसाइतका आग्रही प्राणी दुसरा कुणीच नाही. माझ्याही बाबतीत अगदी तसंच होतं. विद्यार्थीदशेत असताना अगदी अभ्यासात पहिला नंबर येत असला, तरी इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळं काहीतरी करावं असं मला नेहमीच वाटायचं. आणि घडलंही अगदी तसंच...

'मी आठवीत असताना 'National Children's Science Congress (NCSC)' नावाची देशपातळीवरची विज्ञान प्रकल्प स्पर्धा आमच्या 'विद्या प्रतिष्ठान' या संस्थेने आयोजित केली होती. देशभरातून जवळजवळ ६५० प्रकल्पांचा यात समावेश होता. पण त्यात आमच्या संस्थेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग केवळ Activity Corner पुरताच होता. म्हणजे गुजराथच्या एका विज्ञान संस्थेने १००-१५० प्रकल्प आणले होते. ते आम्ही त्यांच्याकडून आयते घेतले आणि प्रदर्शन पाहायला येणाऱ्या लोकांना दाखवले; पण ही गोष्ट काही मला अजिबात रुचत नव्हती. मग मी विचार केला, जर ही मुलं देशपातळीवर चमकत असतील, तर 'आपण का असे आयते प्रकल्प घ्यायचे? प्रकल्प करायला आपल्यालाही का नाही जमणार? डॉ. अब्दुल कलाम जसे यांना शुभेच्छा देताहेत तसे आपल्याला शुभेच्छा का नाही देणार?' बस्स... अगदी याच विचारांनी माझ्या डो यात विचारांचं वादळ सुरू झालं आणि पुढच्या वर्षीच्या म्हणजे 16th NCSC मध्ये 'महाराष्ट्राचं नेतृत्व देशपातळीवर करणारच!' असा निश्चयच मी केला.

इयत्ता नववीचं शैक्षणिक वर्ष सुरू झालं; माझ्या डो यात सारखा तोच विचार घुमत होता, '16th NCSC'! मग काय? मी थेट आमच्या शाळेची स्टाफरूम गाठली अन् आमच्या विज्ञान शिक्षिका सौ. बी. एस. माने मॅडम यांना माझा विचार सांगितला. मॅडमही खूप खूष झाल्या आणि त्यांनी या प्रकल्पासाठी मला मार्गदर्शन करायचं ठरवलं.

झालं! मग काय मी माझे दोन मित्र रोहन व ऋषिकेश यांना बरोबर घेतलं आणि ऑगस्ट, सप्टेंबर, ऑ टोबर हे तीन महिने 'माती' या अगदी जिव्हाळ्याच्या विषयावर काम करायला सुरुवात केली. प्रकल्पासाठी आम्ही हाच विषय निवडला कारण, मातीचं अन् आपलं नातं अगदी अतूट आहे. रासायनिक खतांच्या बेसुमार वापरामुळे माझी धरणीमाता आज आजारी पडली आहे. मात्र, तिचा विचार करायला कुणी तयारच नाही! मग याच प्रश्नावर आम्ही काम करणार आणि आमच्या मातीची आरोग्यपत्रिकाच तयार करणार हे आम्ही निश्चित केलं!

अगदी तीन महिने आम्ही जोमाने 'Problematic Soil of Baramati and a Solution' या प्रकल्पावर काम करत होतो. मग आमच्या प्रकल्पाने ऑ टोबर महिन्यातील जिल्हास्तरीय व नंतर विभागीय स्तरावरही प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरावर प्रवेश केल्यानं आम्हाला खूपच हुरूप आला. औरंगाबाद येथे राज्यस्तरीय स्पर्धा पार पडली आणि तिथेही आमचा प्रकल्प राज्यातून 'सर्वोत्कृष्ट' ठरला. आमच्या प्रकल्पाची '16th NCSC' साठी निवड झाली होती. वर्षभरापूर्वी मी पाहिलेलं 'स्वप्न' सत्यात उतरलं होतं! एवढचं काय, पण राज्यात प्रथम

क्रमांक प्राप्त झाल्यामुळे आमच्या प्रकल्पाची Indian Science Congress (ISC) साठीही निवड झाली होती!'आंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन डोळे' अशीच माझी अवस्था झाली होती. सबंध बारामतीमध्ये आमचं कौतुक होत होतं. कारण NCSC ला पात्र ठरणारा मी 'पहिलाच बारामतीकर' होतो.

16th NCSC नागालँड मधील 'दिमापूर' या शहरात तर 96th ISC ही शिलाँग येथे होणार होती. नागालँडला जायला मिळणार म्हणून मी अगदी खुषीत होतो. शेवटी तो सुवर्णदिन उजाडला. दि. २२ डिसेंबर २००८ रोजी मी नागालँडला जाण्यासाठी प्रस्थान केलं. महाराष्ट्रातून NCSC साठी निवड झालेली सर्व मुलं एकाच ट्रेनमध्ये होती. माझ्यातील व तृत्वगुण व नेतृत्वगुण पाहून आमच्या समन्वयकाने (co-ordinator) माझी 'महाराष्ट्राचा गटप्रमुख' म्हणून निवड केली! माझ्यासाठी तो एक सुखद ध काच होता. CBSC च्या खडाखडा इंग्रजी बोलणाऱ्या मुलांमधून माझी - एका मराठी माध्यमात शिकणाऱ्या मुलाची - प्रमुख म्हणून निवड होणं तसं अनपेक्षितच होतं. मग काय, ट्रेनच्या पाच दिवसांच्या प्रवासात सर्वांना माझ्या कविता व लेख ऐकवले आणि माझं नामकरण अर्थातच 'कविराज' असं झालं.

दि. २७ ते ३१ डिसेंबर दरम्यान आमची 16th NCSC पार पडली. मात्र यातही आणखी एक सुखद ध का मला दिला गेला. ज्या डॉ. अब्दुल कलामांना मी माझा आदर्श मानतो त्यांना भेटण्याची सुवर्णसंधी मला मिळाली कारण 16th NCSC च्या प्रकल्पस्पर्धेत मला राष्ट्रीय स्तरावरचं 'सुवर्णपदक' मिळालं होतं. हे माझं अहोभाग्यच! ज्या दिवशी म्हणजे २९ डिसेंबर रोजी मी डॉ. अब्दुल कलामांना भेटलो तो माझ्या आयुष्यातील सर्वांत अविस्मरणीय दिवस! कलाम सरांचं चालणं, बोलणं, त्यांच्यासोबत गप्पा मारणं हे सारं मी त्यावेळेला अगदी जवळून अनुभवलं. अशाप्रकारे मी माझं स्वप्न अथक परिश्रमानं, माझे आई-वडील आणि माझ्या गुरूजनांच्या मार्गदर्शनामुळे सत्यात उतरवलं. त्यावेळी मला काही ओळी आठवल्या,

*प्रत्येक वादळ मी पेलणार आहे,*
*माझ्यात आत्मविश्वास आहे,*
*पायाखाली जमीन, पाठीवरती आकाश आहे,*
*मातीमध्ये पाय रोवुन, सह्याद्रीसारखा ताठ उभा आहे,*
*जाऊन सांगा त्या वादळांना,*
*तुमची माझ्याशी गाठ आहे ।*

मात्र, या सुखद आठवणी; अनुभव सांगत असताना, मी जे अजूनही वेगळं अनुभवलं ते सांगणंही तेवढंच महत्त्वाचं आहे. आमच्या पूर्ण NCSC वर नागा अतिरे यांच्या हल्ल्याचं सावट होतं. त्यांच्या धमकीमुळे एवढ्या मोठ्या राष्ट्रीय परिषदेत भारताचं राष्ट्रगीत कुठेच गायलं गेलं नाही. मात्र, या अतिरे यानं जे करायचं ते शेवटी त्यांनी केलंच. नागालँडवरून आम्ही परतत असताना गुवाहाटी स्टेशनवर आमची ट्रेन पोहोचायला १५ मिनिटे अवकाश होता आणि आमच्या कानावर बातमी धडकली.'अतिरे यांचा गुवाहाटीत बॉम्बहल्ला!' आमची ट्रेन गुवाहाटी स्टेशनच्या अलीकडेच थांबवली गेली. दूरध्वनी यंत्रणा, स्टेशन सर्व काही बंद करण्यात आलं होतं. आमच्या घरी ही बातमी कळवली गेली. नंतर, गुवाहाटी स्टेशनला आम्हाला न्यायला जवान आले. आम्हाला गुवाहाटीच्या '२४० Transit Camp' येथे कडक बंदोबस्तात नेण्यात आलं. दीड दिवस आम्ही तिथे राहिलो आणि नंतर सर्व वातावरण निवळल्यावर आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. नागालँडची ही 'आगळीवेगळी' आणि 'अविस्मरणीय' अशी सफर करून मी ७ जानेवारीला बारामतीला परतलो.

मित्रहो, असा होता हा माझ्या राष्ट्रीय सुवर्णपदकाचा प्रवास! हे माझे अनुभव आपल्यासमवेत 'share' करताना एकच प्रार्थना करू इच्छितो,

चराचरांच्या सर्व श तींनो, ही आमुची प्रार्थना ।
करा आम्हाला निर्भय, निर्मल, उजळू दे जीवना ।।
उद्योगाची कास धरू द्या, विद्येवर निष्ठा ठेवू द्या ।
साहस शिकवा, संयम शिकवा, उजळू द्या जीवना ।।
समर्थ भारत घडवू आम्ही, द्या आम्हा प्रेरणा ।।


***

**– चि. प्रेमराज चव्हाण**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**चित्रकार : चि. ओंकार जरांडे**






कर्नाटक - बेंगळुरू
भाषा - कन्नड, तुळु, स्थापना - १ नोव्हेंबर १९५६



प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.


डिटेक्टिव्ह नंदू
लेखक आणि चित्रकार – चि. प्रणव कोठावळे
खूपच उशीर झाला, पवार मॅडम मला सोडणार नाहीत.
नशीब! शाळेत तरी पोहोचलो. पण पवार मॅडम?
मी आत येऊ का मॅडम?
नाही, नाही, अजिबात नाही! वर्गाच्या बाहेर थांब.
आज काही खरं नाही...
अरे! भाई फोन का नाही उचलत?
भाई हा तास झाल्यावर त्या नववी ब च्या रश्मीला किडनॅप.... काय??
शेवटच्या तासाला?.... ठीक आहे भाई.
अरे बापरे! ही लोकं तर शेवटच्या तासाला रश्मीला किडनॅप...!




नंदू पटकन पवार मॅडमकडे गेला.
मॅडम कोणीतरी शेवटच्या तासाला रश्मीला किडनॅप करणार आहेत.
काय?
मी खरं बोलतोय. मी स्वत: ऐकलंय.
आताच्या आता बाहेर जाऊन **थांब.**
माझ्यावर कोणाचा विश्वासच नाही. ठीक आहे.
मीच... काय ते बघतो.
तो माणूस टकला होता आणि त्याला फ्रेंच दाढी होती
मधल्या सुट्टीत
ताबडतोब ही गोष्ट रश्मीला जाऊन सांगायलाच हवी.
मला तुझी ही मजा आवडलेली नाही. कळलं ?
मी 'खरं' बोलतोय!



थोड्या वेळात
बंड्याचा मोबाईल घेऊन पोलिसांना फोन लावला तर...
इन्स्पे टर भालेराव आणि त्यांच्या हवालदाराचा माझ्यावर विश्वासच बसत नाहीये. आता मलाच काहीतरी करावं लागेल.
हा!
हा!
हा!
हा!
शेवटचा खेळाचा तास होता.
नंदू खेळत नव्हता. तो रश्मीवर नजर ठेवत होता.
अरे! तू खेळत का नाही आहेस? आपण हरतोय!
माझा पाय खूप दुखतोय.
तो माणूस अजून कसा नाही आला??? फोनवर तो किडनॅपिंगबद्दलच बोलत होता...
आता यावेळीच त्या मुलीला किडनॅप करायचंय मग आपण.... **मालामाल!**



पश्चिम बंगाल - कलकत्ता
भाषा - बंगाली, स्थापना वर्ष - १९५६


थोड्याच वेळात पवार मॅडमने
लगेच पोलिसांना बोलावले.
सॉरी नंदू मला
वाटलं की नेहमीप्रमाणेच...
बघा काका
मी सांगत होतो.
नंदू, सॉरी! मी तुला
चुकीचा समजले.
ठीक
आहे रश्मी.
नंदू ! शाबास ! नेहमी
'फिरकी' घेणारा नंदू आज
शहाणा झाला!
मॅडम
'शाबास'
म्हणाल्या!
समाप्त
पुणे एक्स्प्रेस
नंदू नावाच्या मुलाने केला
किडनॅपरचा पर्दाफाश !
वा ! नंदू !
शाबास!




# येशूच्या मूर्तीचे रहस्य !

– चि. निषाद पटवर्धन

नमस्कार ! मी फ्रॅन्चेस्को पेस - निवृत्त पोलिस अधिकारी. माझ्या अनेक केसेस पैकी माझे वरिष्ठ अधिकारी (आणि अत्यंत जवळचे मित्र !) 'मोहन बॅनर्जी', यांच्याबरोबर सोडवलेली एक केस मी तुम्हाला आज सांगणार आहे.

१९६३ साली ऑगस्ट मध्ये कोलकत्त्यातील 'सेंट जॉर्ज' या अत्यंत प्राचीन चर्चचे नूतनीकरण झाले होते. त्याचबरोबर 'होली क्रॉस' नावाचे अजून एक चर्च बांधले जात होते. मी 'सेंट जॉर्ज' चर्चच्या जवळ राहत असल्याने दर रविवारी तिथे प्रार्थनेला जात असे. २५ ऑगस्ट, नूतनीकरणानंतरचा पहिला रविवार. मी प्रार्थनेला जात असताना मला चर्चच्या बाहेर लोकांचा बराच मोठा घोळका दिसला. मी जरा उत्सुकतेनंच आत जाऊन बघितलं... आणि मला धडकीच भरली. येशूची मूर्ती च  क गायब !! ही एक खूपच मोठी चोरी होती. एक म्हणजे, लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या आणि दुसरं म्हणजे, ती मूर्ती अमेरिकन सिरॅमिकची आणि त्या काळच्या अंदाजे नव्वद हजार रुपयांची होती!

केस मिळालेल्या अधिकाऱ्याने केसची विशेष दखल न घेतल्याने बॅनर्जी सरांनी केसची गंभीरता ओळखून ही केस कमिशनर सरांकडून मागून घेतली.

तपासणी सुरू झाल्यानंतर चौथ्याच दिवशी म्हणजे ३१ ऑगस्टला नवीन झालेल्या 'होली क्रॉस चर्च'मधील मूर्ती सुद्धा चोरीला गेली. आश्चर्य म्हणजे, त्या दोन्ही मूर्ती आणि मूर्ती चोरण्याची पद्धत अगदी सारखी होती ! दोन्ही चर्चमध्ये मूर्तीसाठी एक कोठी केली होती. तिच्या मागच्या बाजूनं चोरानं बहुधा करवतीनं कापलं असावं. मग तिथूनच मूर्ती चोरून मागच्या दरवाजाने चोर बाहेर पडला असावा.

त्या मूर्तींबद्दल चौकशी केल्यावर असे लक्षात आले, की त्या दोन्ही मूर्ती 'गौतम स्टॅच्यु स्टोअर' नावाच्या एकाच दुकानातून विकत घेतल्या गेल्या होत्या. दुकानात जायच्या आधी आम्ही 'होली क्रॉस चर्च'चा अजून तपास करायचं ठरविलं. तिथं आम्हाला कोठीत एका माणसाचा फोटो पडलेला मिळाला. तपासात बाकी काहीच न मिळाल्यानं आम्ही दुकानात गेलो. दुकानदाराच्या सांगण्यानुसार 'येशू'च्या तशा तीन मूर्ती 'गॅस्ट्रो' कंपनीतून आल्या असून पहिली 'सेंट जॉर्ज' चर्च, दुसरी 'होली क्रॉस' चर्च आणि तिसरी 'सेंट मेरीज्' चर्च मध्ये विकली गेली होती. परंतु तिथे त्या फोटोतील व्यि तबद्दल मात्र काहीच कळू शकले नाही.

पुढच्या तपासासाठी आम्ही 'गॅस्ट्रो' कंपनीच्या मॅनेजरला भेटलो. तिथे मात्र आम्हाला त्या फोटोमधल्या माणसाची माहिती मिळाली. फोटो बघताच तो मॅनेजर म्हणाला, ''हा ! हा तर सारंग आहे. जेमतेम दोन आठवडे कामावर होता. फारसा कधी कोणाशी बोलायचा नाही. रात्री कंपनीतच राहायचा. त्याचं काम मूर्ती ओव्हनमध्ये ठेऊन वाळवून घ्यायचं होतं; पण एक दिवशी मी त्याला सिरॅमिक लागलेली सळई धुताना बघितलं होतं. मी त्याला विचारणार तेवढ्यात पोलिस आले आणि तो जो पळून गेला, तो परत आलाच नाही.''

आज ७ सप्टेंबर उजाडला तरी केस म्हणावी तशी सुटली नव्हती. सारंग अचानक पळून गेल्यानं बॅनर्जी सरांनी त्याची अधिक माहिती काढायला सांगितली. मिळालेल्या माहितीनुसार सारंग हा एक फरारी आरोपी होता. २९ जुलैला झालेल्या शहराच्या मध्यवर्ती भागातील 'व्हि टोरिया पॅलेस' मधल्या 'हिरा चोरी'च्या केसमध्ये त्याला दोषी ठरवण्यात आलं होतं.

हे सर्व ऐकताच बॅनर्जी सरांनी मला त्या दिवशी रात्री अकरा वाजता 'सेंट मेरीज्' चर्चजवळ बोलावलं. त्याचं कारण मला तिथं गेल्यावरच कळलं. तिथं रात्री साडेअकरा-बाराच्या सुमारास आम्ही सारंगला रंगेहाथ पकडण्यात यशस्वी झालो.

आता ओळखा बरं, बॅनर्जी सरांनी ही केस कशी सोडवली असेल??


***

– **चि. निषाद पटवर्धन** (इ. ८ वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे 411030
**चित्रकार : कु. वैष्णवी कसबे**

**करून तर पाहा...**

## बांधणी

आपण जवळजवळ रोज वापरतो ते कपडे, हातरुमाल, स्कार्फ, कधीकधी सुंदर, साध्याच; पण उठून दिसणाऱ्या बांधणीने शोभिवंत केलेले असतात. योग्य रंग-संगतीमुळे ते उठून दिसत असतात. आपली नजर खिळवून ठेवणारी ती बांधणीच आपल्याला शिकायला मिळाली तर??



**साहित्य :** कॉटनची पांढरी ओढणी, हवा तो बांधणीचा रंग, कडधान्ये, पुडीचा दोरा, पाणी, मीठ, बादली

**कृती :**

१) प्रथम कॉटनच्या ओढणीवर हव्या त्या आकारात पुडीच्या दोऱ्याने आकारानुसार कडधान्ये बांधून घ्या.

२) गरम पाण्यामध्ये थोडं मीठ घाला.

३) मिठाच्या पाण्यात बांधणीसाठी आवडेल तो रंग घालून कॉटनची ओढणी १० मि. त्यात बुडवा.

४) ओढणी वाळत घाला आणि वाळल्यानंतर त्याचे दोरे नीट काढा.


५) बांधणीची ओढणी तुमच्या ड्रेसवर शोभून दिसेल!

– **कु. सृजना आचार्य** (इ. १०वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे 411030


## ओळखा पाहू?

चार चाकी पण कार नाही,
गाडी आहे पण ब्रेक नाही ।
हॅण्डल आहे पण सायकल नाही,
ओळखा पाहू मी कोण?

डोळ्यावर चष्मा, हातात काठी,
म्हणतात मला खादीधारी।
सत्याच्या मार्गावर चाली,
ओळखा पाहू मी कोण?



नागालँड - कोहिमा, भाषा - अंगामी, कोन्याक, लोथा
स्थापना - १ डिसेंबर १९६३



# धरतीवरील स्वर्ग

– कु. भावना कुंजीर

मी जेव्हा जेव्हा मोठ्या माणसांना विचारलं की,

''तुमच्या आयुष्यातील सर्वात सुंदर दिवस कोणते?'' तेव्हा मला एकच उत्तर मिळालं.

''शाळेतील सहलींचे दिवस!'' मी आठवीत असताना स्वत: सहलीला गेले तेव्हा 'हे असं का?' ते मला कळलं. सहलीचं ठिकाण होतं, 'माथेरान'. त्याबद्दल ऐकलं होतं की, ते एक थंड हवेचं ठिकाण आहे; पण ते फ त थंड हवेचं ठिकाण नसून मी या धरतीवर पाहिलेला तो स्वर्गच होता.

घरापासून तीन दिवसांसाठी मी प्रथमच दूर जात होते. खूप जोमात मी तयारी सुरू केलेली होती; अगदी प्रवासाच्या दोन-चार दिवस अगोदरपासून! सोबत आवश्यक अशा सर्व जिनसा घेतल्या तरी सतत असं वाटत होतं; काही राहिलं तर नाही ना? सहलीच्या आदल्या दिवशी मी लवकर झोपी जायचं ठरवलं जेणेकरून पहाटे उठून तयारी करता येईल; पण उद्याचा

***मिनी ट्रेनमधून आमचा प्रवास सुरू झाला आणि निसर्गाची रम्य दृश्ये आमच्या मनाच्या कॅमेऱ्यात चित्रबद्ध होत गेली. पण खरी मजा तर तिथे पोहोचल्यावरच होती. आमचा मिनी ट्रेनचा प्रवास संपला आणि...***

दिवस न  की कसा असेल या कल्पनेनं झोप काही आलीच नाही. दुसऱ्या दिवशी पहाटेच मी अगदी उत्साहात उठले. पटापट तयारी केली आणि शाळेत पोहोचले. माझ्या मनातला उत्साह मला प्रत्येकीत जाणवत होता. त्याच उत्साहात आम्ही माथेरानला जायला निघालो.

माथेरानची सुंदरता सर्वप्रथम दिसू लागली ती नेरुळ स्थानकापासून, माथेरानपर्यंत जाणाऱ्या मिनी ट्रेन मधून... एका पाठोपाठ एक अशी इतकी दृश्य समोर येऊ लागली, की मग न  की 'इथे पाहू का तिथे' असं झालं. मी नकळत देवाला म्हटलं,



हरियाणा - चंदीगढ
भाषा - हिंदी, पंजाबी, स्थापना - १ नोव्हेंबर १९६६



प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.

'तू आम्हाला फ त दोनच डोळे का दिलेस रे?' 'नेत्रदीपक' दृश्य म्हणजे न की काय? हे मला त्या दिवशी कळलं. सर्वत्र उंचच उंच डोंगररांगा आपलं सौंदर्य अधिकाधिक फुलविण्यासाठी जणूकाही एकमेकांशी स्पर्धा करत होत्या. त्या दाट वृक्षांच्या गर्दीत कुठेतरी पाण्याचा शुभ्र झरा वाहताना दिसताच सगळ्यांचीच नजर तिथे क्षणभर रेंगाळत होती. गाडी जरी पुढे जात होती तरी सगळ्यांच्या नजरा मात्र पाठीमागेच वळत होत्या आणि आपल्या मनाच्या कॅमेऱ्यात त्या दुधाळ प्रवाहाला चित्रबद्‌ध करत होत्या.



मिनी ट्रेनचा प्रवास संपल्यानंतर, आपण एका अप्रतिम लावण्याने नटलेल्या ठिकाणी आलो आहोत, यावर शि कामोर्तब झालं. उत्साह आता शिगेला पोहोचलेला होता. आणखी एक सुखद आश्चर्याचा ध का बसला ते तेथील लाल मातीचा रस्ता पाहून! तो गडद लाल रंग पाहून सुरुवातीला वाटलं 'छे बुवा! आपण अशा रस्त्यांवरून नाही चालू शकत.' पण जेव्हा त्या मातीत पावलं पडू लागली तेव्हा वाटलं पायातील चपला देखील काढून टाकाव्यात. तिथे आमच्या मु कामाची सोय चांगली होती. शाळेतल्या मुलांसाठी विशेष सोय

होती. तर इतर पर्यटकांना सुद्धा धर्मशाळा, विविध हॉटेल्स उपलब्ध होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही माथेरानच्या डोंगरांवर फिरू लागलो. तिथे तलावाच्या आसपास पक्ष्यांच्या किलबिलाटाने वातावरण मुग्ध झाले होते. 'इको पॉईंट'वर सगळ्यांनीच आपापल्या आवाजाच्या प्रतिध्वनीचा आनंद लुटला; पण माझ्या नजरेत भरला होता तो 'रामबाग पॉईंट'वरून बघितलेला सूर्यास्त !! इतका लोभस सूर्यास्त मी आज पहिल्यांदाच पाहत होते. माझ्या मैत्रिणी आवाज देत होत्या; पण माझं लक्ष कुठं होतं ! माझं पूर्ण लक्ष होतं त्या तेजस्वी गोळ्याकडे...

इथे येऊन सूर्यास्त पाहिल्यानंतर हनुमानाला 'आपण याला हातात घ्यावं' असं का वाटलं असेल याची कल्पना येते. अर्थात, मी असं न कीच करणार नव्हते. शिक्षकांनी बोलावलं नसतं, तर कदाचित मी तो संपूर्ण सूर्यास्त होईपर्यंत तिथेच उभी राहिले असते, एवढं मात्र न की.


रात्री शेकोटी आणि सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यावर सगळे झोपी गेलो. झोपताना मला मात्र उत्सुकता होती ती आपण उद्या काय करणार याची! तोही दिवस रोजच्या दिवसांपेक्षा लवकरच उजाडला. त्यादिवशी आम्ही घोडेस्वारी केली. आयुष्यात प्रथमच घोड्यावर बसण्याची संधी मिळाली होती. जसा त्या घोड्याने वेग घेतला, तसं माझं हृदय दुप्पट वेगाने वाजायला लागलं. जीव मुठीत घेऊनच बसले होते मी ! तो एक थरारक अनुभव होता. आणखी एक आकर्षण म्हणजे झाडांवरून इकडे तिकडे फिरणारी माकडं ! तुम्ही त्यांना पाहण्यात असे दंग होता की, समोर कोणालातरी धडक लागल्यानंतरच पुन्हा भानावर येता. नंतर आम्ही स्टेशन परिसराजवळील मार्केटमध्ये थोडीफार खरेदी केली.

शेवटी जाण्याची वेळ आलीच जी अर्थातच कोणालाच पसंत पडण्यासारखी नव्हती; पण ती टाळण्यासारखी सुद्धा नव्हती. निसर्गातील समृद्ध अनुभव मनात साठवून आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो.

***

**– कु. भावना विजय कुंजीर** (इ.९वी)
गणेश कृपा चाळ, लोकमान्यनगर,
पाडा नं. ४, ठाणे 400606
**चित्रकार – कु. संयु ता रावत**

## छात्र प्रबोधन दिवाळी अंकाविषयी काही बोल या प्रतिक्रिया...



सर्वच दिवाळी अंक अप्रतिम!! 'ग्रामीण दिवाळी अंकातल्या कथा व लेखमाला विशेष आवडली. 'छात्र प्रबोधन'ला मन:पूर्वक शुभेच्छा !


**– श्री. हरिहर आठलेकर,** ज्येष्ठ लेखक – सावंतवाडी

तुम्ही पाठवलेले 'छात्र प्रबोधन' व 'युवोन्मेष'चे दिवाळी अंक व सोबतची डी. व्ही. डी. व माझ्या कथेचे कात्रण मिळाले; दोन्ही अंक 'उत्तम' ह्या विशेषणाला पात्र आहेत; संग्राह्य आहेत. 'छात्र प्रबोधन' अंकातील 'निर्णयातील स्वावलंबन' उपक्रम अत्यंत महत्त्वाचा, प्रत्येक युवक-युवती, बाल-बालिका यांनी शिकावा असाच आहे. 'युवोन्मेष' मधील सर्वच लेख आवडले. डी.व्ही.डी. बघणे अजून जमले नाही, बघितली की कळवेन.

**– अंजनी नरवणे,** ज्येष्ठ लेखिका –पुणे

छात्र प्रबोधनच्या दीपावली विशेषांकाचं विशेष कौतुक करायला हवं. सर्व अंक मस्त. सीडी उत्कृष्ट झाली आहे.

**– श्री. किरण पुरंदरे,** लेखक, निसर्गप्रेमी – पुणे



हिमाचल प्रदेश - शिमला, भाषा - हिंदी, पहाडी, किन्नौरी
स्थापना - २५ जानेवारी १९७१

# सेवाभावी संस्था : रामकृष्ण मठ, पुणे

– कु. वैष्णवी सुभेदार , कु. सृष्टी प्रधान



***जगातील अवघ्या मानवजातीचे कल्याण हा व्यापक दृष्टीकोन स्वीकारून १९८४ साली रामकृष्ण मठ पुण्यात स्थापन झाला. जाणून घेऊया या संस्थेच्या पुण्यातील शाखेच्या कार्याविषयी...***

सर्व जातीधर्मातील अन् विविध सामाजिक व आर्थिक अशा सर्व स्तरांतील लोकांना आश्रय देणाऱ्या 'रामकृष्ण मठ' व 'रामकृष्ण मिशन' ची स्थापना 'स्वामी विवेकानंद' यांनी १ मे १८९७ साली केली. श्री रामकृष्ण यांचा उपदेश स्वामी विवेकानंद यांना संपूर्ण उमगला असल्याने स्वामीजी वेदान्ताची प्रत्यक्ष कर्माशी सांगड घालत होते. दीन-दुबळे-अनाथ-अपंग-निराश्रित-सामान्य गरजवंत यांमध्ये 'नारायण' पाहून त्यांच्या निरपेक्ष सेवेत मग्न होणारे संन्यासी स्वामीजी घडवू इच्छित होते. म्हणूनच 'आत्मनो मोक्षार्थं जगत् हिताय च' अर्थातच 'स्वत:च्या मोक्षासाठी व जगाच्या कल्याणाकरिता,' हे रामकृष्ण मठाचे बोधवा य मानले जाते.

रामकृष्ण मठ हा कोणत्याही एका मतप्रणालीशी, पंथाशी वा संप्रदायाशी बांधील नाही. जगातील अवघ्या मानवजातीचे कल्याण हा व्यापक दृष्टीकोन स्वीकारून रामकृष्ण मठ आपल्या स्थापनेपासून अखंड कार्य करत आहे.

श्री रामकृष्ण, स्वामी विवेकानंद, शारदामाता यांचे विचार सर्वांपर्यंत पोहचावेत यासाठी रामकृष्ण संघातर्फे अनेक उपक्रम राबवले जातात. मठाच्या एकूण १७१ शाखा केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभर पसरलेल्या आहेत. पुण्यातील शाखेतर्फे लहान मुलांसाठी दरवर्षी ६ दिवसांचे संस्कार शिबिर; शालेय विद्यार्थ्यांसाठी गीता-स्तोत्र व उतारा पाठांतर, पद्यगायन, प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध, व तृत्व, एकपात्री प्रयोग इ. स्पर्धा; महाविद्यालयीन गटासाठी स्वामीजींचे चरित्र, त्यांचे विचार इत्यादी विषयांवर व्याख्याने नियमित होत असतात. याचबरोबर पुस्तक विक्री, प्रज्ञावर्धिनी, अभ्यासिका हे उपक्रम मठातर्फे राबवले जातात. ग्रंथालय, संगणक प्रशिक्षण केंद्र, वैद्यकीय सेवा हे विभाग मोठ्या प्रमाणावर चालवले जातात.

विविध स्पर्धांबरोबरच शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध सोयी-सुविधा देखील मठातर्फे उपलब्ध करून दिल्या जातात. मठाच्या आसपासच्या परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुले येथे येतात. त्यांच्या शारीरिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी 'बालक संघ', अभ्यास सहली, खेळांच्या स्पर्धा, सूर्यनमस्कार, गणेशोत्सव-दहिहंडी-प्रजासत्ताक दिन यांसारखे कार्यक्रम वर्षभर चालू असतात. गावातील शालेय विद्यार्थ्यांना गणित, इंग्रजी या विषयांत मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांना गुणांवर आधारित शिष्यवृत्ती दिली जाते. तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला आणि क्रीडा या विषयांत त्यांच्या अभिव्य तीला वाव देण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रकल्पाअंतर्गत दर शनिवारी मठाकडून सात शिक्षकांचा गट वेगवेगळ्या गावांमधील शाळांना भेटी देत असतो.

येथील अभ्यासिका, संगणक प्रशिक्षण केंद्र व ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यरत आहेत.



**संगणक कक्ष**

एकाच वेळी एकूण नव्वद विद्यार्थ्यांना स्वच्छ, शांत व प्रसन्न वातावरणात अभ्यास करता येईल असा अभ्यासिकेचा प्रशस्त कक्ष मठात उपलब्ध करून दिला आहे. बुधवारची साप्ताहिक सुट्टी वगळता अन्य कोणतीही सार्वजनिक सुट्टी न घेता विद्यार्थी सकाळी सात ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत येथील अभ्यासिकेचा लाभ घेऊ शकतात. दहावी, बारावी, सी. ए., इंजिनिअरिंग, स्पर्धा परीक्षा व अन्य पदवी परीक्षा यासाठी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा येथे मोठ्या प्रमाणावर ओघ असतो.

संगणक युगात सर्वांना पाय रोवून उभे राहता यावे यासाठी मठातील संगणक प्रशिक्षण केंद्रामध्ये व्यावसायिकदृष्टीने महत्त्वाच्या अशा अभ्यासक्रमावर भर दिला जातो. अभ्यासक्रमात एम.एस.सी.आय.टी., एम.एस. ऑफिस, टॅली, डी.टी.पी. इत्यादी अभ्यासक्रम समाविष्ट केले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष देणं, त्यांना आपुलकीनं शिकविणं, त्यांच्यात शिकण्याची आवड निर्माण करणं व प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनावर भर देणं; यांमुळे विद्यार्थ्यांना भरघोस यश मिळत आहे. मठाच्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सध्याच्या काळाची गरज लक्षात घेऊन केवळ संगणकीय ज्ञान न मिळवता 'विद्यार्थ्यांचे मठाशी आत्मिक नाते जोडले जावे', हा प्रधान हेतू मानून रोज विद्यार्थ्यांना विवेकानंदांचे चरित्र वाचण्यास सांगितले जाते. संगणकाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर 'चरित्रावरून काय समजले' हे जाणण्यासाठी त्यांची ५० गुणांची परीक्षाही घेतली जाते. विद्यार्थ्यांबरोबरच ज्येष्ठ नागरिकही येथे उत्साहाने संगणक प्रशिक्षणार्थ येतात.

येथील ग्रंथालयामध्ये श्री रामकृष्ण – विवेकानंदांचे वाङ्मय, वेदान्त वाङ्मय व धर्म–अध्यात्म शास्त्रावरील अन्य वाङ्मय यासंबंधीची मराठी – हिंदी – इंग्रजी – बंगाली भाषांतील रामकृष्ण मठातर्फे प्रकाशित झालेली असंख्य पुस्तके वाचन व विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तिथे ग्रंथालयामध्ये विविध प्रकारचे वैज्ञानिक, ऐतिहासिक, तत्वज्ञान, मनोज्ञान, सामाजिक व सांस्कृतिक पुस्तके व कोश वाङ्मय आहेत. ग्रंथ विक्री विभागाचे कार्यक्षेत्र विस्तारावे या कल्पनेतून 'फिरता पुस्तक–विक्री' उपक्रम साकारला आहे. तसेच जास्तीत जास्त लोकांमध्ये वाचनरुची वाढावी व जास्तीत जास्त पुस्तके एका ठिकाणी मिळावीत यासाठी पुस्तक प्रदर्शने भरवण्यात येतात. पुस्तकांबरोबरच ध्वनिफिती, सीडी व छायाचित्रेही उपलब्ध आहेत.

व्य तीच्या जडणघडणीत शिक्षणाबरोबर 'आरोग्य' हा देखील महत्त्वाचा घटक आहे. हे जाणून सुसज्ज आणि अद्ययावत यंत्रसामग्री व सर्व सोयींनी यु त असलेले 'वैद्यकीय सेवा विभाग' कार्यरत आहे. विशेष वैद्यकीय सेवा देण्यासाठी २० विभाग कार्यरत असून प्रत्येक विभागात तज्ज्ञ डॉ टर आहेत. याच सोबत विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी आणि गरजेनुसार त्यांना मोफत वैद्यकीय सेवाही पुरवली जाते.

श्री रामकृष्ण यांचा एकशे पंचाहत्तरावा जयंती महोत्सव व स्वामी विवेकानंद यांच्या दिडशेव्या जयंती महोत्सवानिमित्त यावर्षी (२०११–१२) मठातर्फे बरेच कार्यक्रम आयोजित केले होते.

**(अ) युवाश ती जागरण यज्ञ –** या कार्यक्रमांतर्गत येत्या तीन वर्षांच्या कालावधीत विविध वयोगटातील दहा लाख विद्यार्थ्यांपर्यंत स्वामी विवेकानंदांचे

प्रेरणादायी व आदर्श जीवन घडवण्यास आवश्यक असे 'विचार' पोहोचवण्याचा मानस आहे. त्यानुसार, आजपर्यंत सुमारे साडेतीन लाख विद्यार्थ्यांपर्यंत हे विचार संस्थेला पोहचवता आले आहे.

**(ब) कुमार – तरुण वयोगटासाठी स्पर्धा** – 'दीन-दु:खितांची, निराधारांची सेवा करणे म्हणजेच ईश्वराची खरी पूजा होय.' हा विचार सर्वांच्या मनात रुजावा यासाठी 'सेवा स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले होते. गरीब-गरजूंना औषधे, अन्न इत्यादी वस्तुंचे वाटप; वाड्या-वस्त्यांवरील मुलांना शिक्षण, स्वच्छतेचं महत्व व सामूहिक कार्यायोगे सोयी निर्मिती ह्या प्रकारच्या सेवांचा या स्पर्धेत अंतर्भाव केला होता. या स्पर्धेत युवक गटातून एकूण सदुसष्ट गटांनी नावे नोंदविली होती व अठ्ठेचाळीस प्रकल्प अहवाल प्रत्यक्षात प्राप्त झाले. कुमार गटातून पुणे व परिसरातील शाळांमधून सुमारे नऊशे गटांनी नावे नोंदवली होती.

**(क) गदाधर अभ्युदय प्रकल्प –** युवाश तीच्या जागरणावर आणि युवकांमधील कार्यश तीवर भर देण्यासाठी हा उपक्रम योजला गेला आहे. या उपक्रमाअंतर्गत पोषक आहार, गणवेष, पुस्तके, वह्या यांचे वाटप तसेच शारीरिक तपासणी, स्वच्छतेच्या सवयी लावणे, व्यायाम – खेळ – आसने करवून घेणे याही गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. सध्या या उपक्रमांतर्गत सहाशे विद्यार्थी लाभ घेत आहेत. उपक्रमाची गरज व प्रतिसाद लक्षात घेऊन हे उपक्रम संपूर्ण तीन वर्ष (२०११-१४) चालणार आहेत.

**(ड) स्वामी विवेकानंद स्वास्थ सेवा प्रकल्प –** चिंचवड (पुणे) व आंदगाव (मुळशी) या भागातील बारा वर्षांपर्यंतच्या कुपोषित मुलांच्या स्वास्थ्यासाठी हा आरोग्य प्रकल्प आखण्यात आला आहे.

विविध उपक्रम, स्पर्धा, कार्यक्रम, योजना, सेवा अशा विविधतेने परिपूर्ण असलेल्या, तसेच युवा गटापासून प्रौढ गटापर्यंत सर्वांना प्रेरणा देणाऱ्या या संस्थेत आपणही आवर्जून सक्रिय सहभागी होऊयात व त्यांना असेच उत्तमोत्तम यश लाभो अशी मन:पूर्वक प्रार्थना करूयात!

***

**– कु. वैष्णवी सुभेदार , कु. सृष्टी प्रधान** (इ. ११ वी)
२३५/बी, फ्लॅट नं. १२, परेश अपार्ट., पर्वती, पुणे 411009


## येशूच्या मूर्तीचे रहस्य – उत्तर


बॅनर्जी सरांनी त्यांच्या सराईत शोधक नजरेनं ती केस सोडवली होती. सारंगनं चोरी शहराच्या मध्यवर्ती भागातून केली होती; म्हणूनच तो शहराच्या बाहेर असणाऱ्या, तेही मूर्तींच्या कंपनीत कामाला गेला. तिथे त्याला कोणी ओळखणारही नव्हतं आणि हिरा लपवणं सोपंही जाणार होतं. जेव्हा सरांना कळलं की, 'गॅस्ट्रो' कंपनीत पोलिस जायच्या आधी सारंगच्या हातात सिरॅमिक लागलेली सळई होती; तेव्हाच त्यांना शंका आली की त्याने मूर्तीत काहीतरी लपवलेले असावे आणि तीच गोष्ट मिळविण्याच्या हेतूने त्याने मूर्ती चोरल्या असाव्यात. म्हणूनच त्यांनी मला सारंगची अधिक माहिती काढायला सांगितली. त्यांची शंका अगदी खरी ठरली. सारंगने चोरीतील हिरा मूर्तीत लपविला आणि त्याचसाठी तो चोरी करत होता. परंतु मूर्ती अगदी सारख्या असल्यामुळे त्याला दोन्ही मूर्ती चोराव्या लागल्या होत्या. त्याला पकडायचे कसे हा अवघड प्रश्न होता; पण दुकानदाराच्या सांगण्यानुसार त्याला हिरा मिळाला नसेल, तर तो 'सेंट मेरीज्' चर्चमधली मूर्ती देखील चोरायचा प्रयत्न करेल. दुसरी चोरी त्याने बरोबर एक आठवड्याने केली होती. आज दुसऱ्या चोरीला आठवडा पूर्ण होत होता. म्हणून त्यांनी त्याच रात्री मला 'सेंट मेरीज्' जवळ बोलाविले आणि आम्ही सारंगला रंगेहाथ पकडण्यात यशस्वी झालो.



त्रिपुरा - अगरतळा
भाषा - बंगाली, मणिपुरी, स्थापना - २१ जानेवारी १९७२

# द्रवरुपी इंद्रधनुष्य !









**साहित्य :** पारदर्शक अथवा पांढरा स्ट्रॉ, पाणी पिण्याचे चार पेले (ग्लास), मीठ, पाणी, रंग (पाण्यात विरघळतील असे)

**कृती :** १) चारही पेल्यांमध्ये व्यवस्थित पाणी भरून घ्या व त्या पेल्यांना १, २, ३, ४ असे क्रमांक द्या.

२) चारही पेल्यांमध्ये चार विविध रंग टाकून ते नीट ढवळून घ्या.

३) पेला क्रमांक १, २, ३, ४ मध्ये अनुक्रमे ०, २, ४, व ६ चमचे मीठ घालून ते नीट विरघळू द्या.

४) आता पेला क्रमांक १ मध्ये १-२ सेमी. स्ट्रॉ आत घाला व बाहेर काढायच्या आधी स्ट्रॉ चा वरचा भाग बोट ठेवून बंद करा, जेणेकरून त्यातील पाणी आतमध्येच राहील. स्ट्रॉ बाहेर काढल्यावर तुम्हाला रंगीत स्तंभ (Column) मिळेल.

५) स्ट्रॉ वर बोट ठेवूनच तो पेला क्रमांक २ मध्ये ३-४ सेमी. पर्यंत आत घाला. एका सेकंदासाठी बोट काढा व परत बोट ठेवून स्ट्रॉ मधील पाणी अडवा. स्ट्रॉ पेल्यातून बाहेर काढल्यावर तुम्हाला दोन विविध रंगांचे स्तंभ मिळतील.

६) हीच कृती पेला क्रमांक ३ व ४ साठी करा. पण पेला क्रमांक ३ मध्ये स्ट्रॉ ५-६ सेमी. व पेला क्रमांक ४ मध्ये ७-८ सेमी. आत न की घाला बरं का!


अशीच कृती करून तुम्ही संपूर्ण इंद्रधनुष्यसुद्धा तयार करू शकता!

**तत्त्व :** या विज्ञान प्रयोगाला 'घनत्व' या वैज्ञानिक तत्त्वाचा आधार आहे. ज्या पाण्यात मीठ जास्त, त्या रंगाचा स्तंभ सगळ्यात खाली आणि मीठ नसलेल्या रंगाचा स्तंभ सगळ्यात वर दिसून येईल.

कारण ज्या पाण्यात मीठ सर्वात जास्त त्याची घनता सगळ्यात जास्त; आणि ज्या पाण्यात मीठच नाही त्याची घनता सगळ्यात कमी. स्ट्रॉ मध्ये पेला क्रमांक १, २, ३, ४ मधील पाणी न घेता विरुद्ध क्रमाने घेतले तर काय होईल पाहा बरं!!!

**- संकलन**

**चित्रकार - कु. प्राज ता कुंभार**



सि कीम - गंगटोक
भाषा - लेप्चा, भुतिआ, लिंबू, स्थापना - १५ मे १९७५

# चावरे आजी

**कु. गौतमी कुलकर्णी**

सकाळी ८ ची वेळ. हा म्हणजे आमच्या घरातल्यांचा 'प्राईम टाईमच'! सगळ्यांची धावपळ .... कोणी ऑफिसला, कोणी शाळेला, कोणाला घरकामाची घाई ! आई-बाबा मला घाई करत होते, 'बस येईल आटप लवकर' चा माझ्या नावानी शंखनाद होत होता...मी घाईघाईत घराबाहेर पडले. अवतीभवती नेहमीप्रमाणे खूप लोक! प्रत्येकाचे स्वभाव-शिष्टाचार वेगवेगळे असलेले!! रोजच आपल्याला अशा अनेक व्य ती भेटत असतात. काही व्य ती तर स्वत:मध्ये इत या दंग असतात की, समोरून येणाऱ्या व्य तीकडे स्मितहास्य करून पाहाण्याचंही भान त्यांना नसतं. कुणी वैतागलेल्या चेहऱ्याने समोरच्या व्य तीसमोरून पुटपुटत जाणारी; तर कोणी दुसऱ्याची विचारपूस तर सोडाच, साधं हसूनसुद्धा न बघणारी! शिष्टाचार आहेत म्हणून तरी निदान बघावं; पण तेही नाही!

अशाच 'वल्ली' नेहमीप्रमाणे मला दिसत होत्या. माझं सुद्धा काय वेगळं होतं म्हणा!! सकाळच्या धावपळीनं वैतागलेली मी पटकन लिफ्टच्या बाहेर आले आणि तेवढ्यात एक प्रसन्न स्नेहभरला स्वर कानावर पडला, ''कशी आहेस गौतमी?'' तो मधाळ, प्रसन्न स्वर ऐकावा आणि सर्व धावपळ अन् वैताग जावा, अशीच ती आपुलकीनं केलेली चौकशी होती...

ही चौकशी ज्यांनी केली होती त्या होत्या 'चावरे आजी!' प्रसन्न, आनंदी, आपुलकीनं ओतप्रोत भरलेल्या...

एका हातात काठी, अंगात स्वेटर, डो याला मफलर, प्रसन्न आणि उत्साही चेहरा अशा वेषात सकाळ-संध्याकाळ चावरे आजी फिरायला इमारतीबाहेर पडतात. खरं तर सकाळ-संध्याकाळ सर्वांची धावपळीची वेळ; पण तरीही चावरे आजी प्रत्येक जाणाऱ्या-येणाऱ्याची आपुलकीनं चौकशी करतात. वेळ धावपळीची असली, तरीही प्रत्येकजण त्यांना भेटूनच जातं. कारण वयानी जरी त्या म्हाताऱ्या असल्या, तरी मनाने त्या एकदम तरुण आहेत! जात्याच गमत्या आणि बडबडा स्वभाव असल्यानं त्यांच्या मधुर, रसाळ वाणीनं आपण कितीतरी वेळ रमतो.



लहानपणापासूनच मी त्यांना 'चावरे आजी' म्हणते. जशी बघते, तेव्हापासून आजतागायत त्यांना कधी उदास-दु:खी, हतबल किंवा म्हातारपणावर वैतागलेल्या पाहिलेलं नाही. मध्ये त्यांच्या पाठीचं ऑपरेशन झालं, तरी त्या काही हतबल किंवा कंटाळलेल्या दिसल्या नाहीत. आपल्या मैत्रिणींबरोबरचा कट्टा त्यांनी त्यांच्या लोकप्रियतेमुळे आपल्या खोलीत हलवला! आणि झाल्या ऑपरेशनवर हळहळण्यापेक्षा त्यांनी त्यावरच विनोद केले आणि गप्पांमध्ये रंगत आणली.

आजींना वाचनाची फार आवड! त्यांनी भरपूर पुस्तके वाचून काढली आहेत. अक्षरश: एकेका दिवसात त्या पुस्तक संपवतात आणि वाचनाची भूक भागवतात. पाठीच्या ऑपरेशननंतर तर त्यांनी साधारणत: म्हाताऱ्या आजींसारख्या झोपा काढण्याऐवजी माझी अखखी लायब्ररीच वाचून संपवली!

याला म्हणतात खरं वाचनप्रेम!



मिझोराम - ऐजाल

भाषा - मिजो, इंग्रजी, स्थापना - २० फेब्रुवारी १९८७



संग्रही ठेवा - '**बकुळफुलं**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-

चावरे आजी आधी शिक्षिका होत्या. ती शिस्त, तो शिक्षकीपेशा अजूनही त्यांच्यात आहे. आजींना प्रत्येक गोष्टीचं खूप कौतुक असतं. एकदा मी लिहिलेला एक निबंध आणि कविता आजींना दाखवायला गेले. आजींना इतका आनंद झाला! आणि खूप कौतुक वाटलं माझं! मग त्यांनी मला शाबासकी आणि बक्षीस दिलं! त्या बक्षिसापेक्षाही त्यांची कौतुकाची थाप माझ्यासाठी मोलाची होती!

त्यांच्या या कौतुकामुळेच मला आणखी लिहायला प्रोत्साहन मिळालं. चावरे आजी म्हणजे 'अवघे पाऊणशे वयमान!' यातील 'अवघे' शब्द हा चावरे आजींच्या वर्णनात चपखल बसतो. वयवर्षे ७५ असूनही त्यांच्यातला उत्साह दांडगा आहे. मला तर कधी कधी वाटतं, झाडांना जसा सूर्य ऊर्जा पुरवतो, तसं चावरे आजींचं सुद्धा कोणी ऊर्जास्थान आहे की काय... जादूच्या थैलीतली नाणी कधी संपतच नाहीत, सारखी येतच राहतात; अशी ऊर्जेसंदर्भातली जादू चावरे आजींच्या बाबतीत होते का, अशी शंका येऊ लागली आहे मला!

गणपती उत्सव म्हणजे अगदी उत्साहाचे वातावरण! अशा प्रसंगी चावरे आजी मागे कशा राहतील? गणपतीच्या रोजच्या आरतीपासून सर्व कार्यक्रमांपर्यंत त्या उपस्थित असतात. त्यांना प्रसन्न, उत्साही, जल्लोषात पाहिलं, की आपल्यातसुद्धा उत्साह भिनतो आणि ते वातावरण पूर्णपणे अनुभवत आपण त्याचा आस्वाद घेतो.

चावरे आजी ध यावर ध के देत असतात. मागच्या वर्षी तर त्यांनी कमालच केली, सरळ सोसायटीतल्या महिला मंडळाच्या नाटकात गेल्या. बाकी सगळ्या ३० ते ५० वर्षीय तरुण बायका पण या मात्र, त्या नाटकात गेल्या आणि सर्वांच्या तोडीस तोड केला की हो अभिनय! असे ठस यात म्हटले संवाद, की सर्वांनी त्यांना उभे राहून टाळ्या वाजवून दाद दिली. कितीही वय असलं तरी मनापासून केल्यास त्याचा कामावर काही परिणाम होत नाही, हेच जणू त्यांनी दाखवून दिलं... 'हम भी कुछ कम नही' असं जोषात सांगत त्यांच्या विनोदी शैलीमुळे अवघ्या वातावरणात उल्हास निर्माण केला.

काही माणसं सारखी दु:ख उगाळत बसतात; पण चावरे आजींच्या स्वभावात हे बसतच नाही.

मंगेश पाडगावकरांनी एक प्रसंग सांगितला आहे, 'एकदा पाडगावकरांना त्यांचे जुने स्नेही भेटले. पाडगावकरांनी त्यांना सहज प्रश्न केला, ''काय म्हणता?'' वयोमानानुसार झालेल्या प्रकृतीच्या तक्रारी आता बहुदा ऐकाव्या लागणार अशी पाडगावकरांनी मानसिक तयारी केली होती; पण ते वृद्ध स्नेही म्हणाले,''वंडरफूल, पाडगावकर वंडरफूल! गेले २ महिने मी एका झाडाला पाणी घालत होतो. पार वाळलं होतं ते! आणि आज सकाळी पाहतो तर त्याला फूल आलेलं!''

चावरे आजी देखील अशाच आहेत, स्वत:ची दु:खं विसरून जगाला प्रफुल्लित करणाऱ्या! काही माणसं दु:खाला सदैव कवटाळून बसतात, काही जण कधीच समाधानी नसतात, काही जण जीवन नकोसं झाल्याप्रमाणे दुर्मुखलेला चेहरा घेऊन बसतात, तर काही जीवनाचा आनंद लुटतात...

म्हणूनच मंगेश पाडगावकर म्हणतात,

*'सांगा, कसं जगायचं?*
*कण्हतकण्हत की गाणं म्हणत?*
*तुम्हीच ठरवा...'*

चावरे आजी अगदी त्याच पठडीतल्या आहेत... जीवनाचा आनंद लुटणाऱ्या! त्यांच्याकडे पाहून मी नेहमी ठरवते,

'आपण जगायचं ते चावरे आजींसारखं... गाणं म्हणत !!'


***

**कु. गौतमी कुलकर्णी** (इ. ८ वी)
अक्षरनंदन, सेनापती बापट रस्ता,
पुणे 411016

**चित्रकार – कु. प्रांजली मराठे**



अरुणाचल प्रदेश - इटानगर, भाषा - मोनपा, मिजी, अका
स्थापना - २० फेब्रुवारी १९८७



# क्षण निर्णयाचा...

***छात्र प्रबोधनच्या यंदाच्या दिवाळी विशेषांकात (सौर कार्तिक) 'निर्णयातील स्वावलंबन' या विषयावरील वेगवेगळे लेख तुम्ही नक्की वाचले असतील.***

***तुमच्या एवढ्याच प्रियानं एक निर्णय स्वत:हून घेतला. म्हटलं तर लहानसाच पण म्हटलं तर खूप महत्त्वाचा... वाचूया पुढच्या प्रसंगातून...***

प्रिया एका लहान गावात राहणारी हुशार मुलगी होती. तिला सातवीत चांगले गुण मिळाले म्हणून तिच्या घरच्यांनी तिला शहरात पुढील शिक्षणासाठी पाठवले. प्रियादेखील आनंदाने पुण्यात आली. ती मुळात हुशार असल्यामुळे तिला अभ्यासात विशेष काही अडचण येत नव्हती; मात्र, अडचण होती ती इंग्रजीची. इथे आल्यावर इंग्रजीचं तिला एकदम ओझं वाटू लागलं. पण प्रियाच्या सर्व मैत्रीणी चांगल्या होत्या. त्या इंग्रजीच्या अभ्यासात तिला मदत करत होत्या. बाई देखील तिला काही शंका असतील तर समजावून सांगत होत्या. तिला आता स्वत:बद्दल थोडा आत्मविश्वास वाटू लागला. एके दिवशी बाईंनी एका संस्थेतर्फे भरवण्यात येणाऱ्या आंतरशालेय इंग्रजी व तृत्व स्पर्धेची सूचना वाचली. बाईंनी वर्गात इंग्रजीवर प्रभुत्व असणाऱ्या दोन चुणचुणीत मुलींची निवडही करून टाकली. त्या रात्री काही प्रियाला झोप लागली नाही. बाई आपल्या नावाचा इंग्रजी स्पर्धेसाठी कधी विचार करणार? आपण आपल्या स्वत:च्याच जबाबदारीवर या स्पर्धेत उतरलो तर? तिची द्विधा मन:स्थिती झाली होती. फार तर फार सगळ्यांसमोर हसं होईल. मात्र नीट तयारीनिशी एकदा या स्पर्धेच्या माध्यमातून चार लोकांसमोर उभं राहून स्पष्ट इंग्रजी आपण बोलू शकलो तर त्यातून मिळणारा आनंद अतुलनीय व आत्मविश्वास उंचवणारा असेल, असा विचार करून तिनं या स्पर्धेत स्वत:च्याच जबाबदारीवर भाग घेण्याचं निश्चित केलं. एरवी आई-बाबांना विचारल्याशिवाय निर्णय न घेणाऱ्या प्रियाने आज पहिल्यांदा स्वत:चा निर्णय घेतला. हे तिनं स्वत:च ठरवल्यामुळे सर्व जबाबदारी तिच्यावर होती. भाषण तिनं स्वत:च लिहून काढलं, बाईंकडून तपासून घेतलं, आरशासमोर शंभरदा वाचलं, पाठ केलं. एकदा बाईंनी तिला वर्गात भाषण म्हणून दाखवायलाही सांगितलं. तिचं भाषण पूर्ण तयार होतं. सगळं लक्षात होतं; पण समोर उभं राहिल्यावर तिला काहीच आठवेना. बाईंदेखील थोड्या नाराज झाल्या. स्पर्धा तर पुढच्याच आठवड्यात होती. प्रियाला वाईट वाटू लागले. आपण घेतलेला निर्णय चुकीचा आहे की काय असं सारखं वाटू लागलं. तिच्या वर्गातल्या काहीजणी तिला म्हणाल्या देखील, 'सगळ्यांना इंग्रजी बोलता येतंच असं नाही.' प्रियाला रडू येऊ लागलं; पण आता काही झालं तरी पूर्ण जिद्दीने कामाला लागायचं, असं तिनं ठरवलं. त्याच आठवड्यात तिच्या मामाच्या घरी कार्यक्रम होता; पण प्रियानं गावाला जायचं नाही असं ठरवलं. तिची आई तिच्यावर खूप नाराज झाली. घरच्या कार्यक्रमापेक्षा स्पर्धा एवढी महत्त्वाची आहे का? असं तिच्या आईला वाटलं. पण प्रियाने आता मागं हटायचं नाही असं ठरवलं होतं.

आज स्पर्धेचा दिवस! इतके दिवस मनात असलेला संभ्रम आज पार पळून गेला. आज प्रिया एका वेगळ्याच आत्मविश्वासानं- उत्साहानं स्पर्धेला सामोरी गेली...

बाईंनी निवड केलेल्या तिच्या वर्गमैत्रिणींइतकंच तिचंही भाषण स्पर्धेत प्रभावी ठरलं. 'त्यावेळी' तिनं घेतलेल्या निर्णयाचा आनंद 'आज या क्षणी' तिच्यासाठी शब्दांच्या पलिकडचा होता.

***

**कु. उन्मेषा काळे** (इ. ९वी)
३ जे/८, इंडिका डी, आदित्य गार्डन सीटी,
वारजे, पुणे 411057

मित्रांनो, वरील प्रसंग वाचून तुम्हाला काय वाटलं? प्रियानं घेतलेला निर्णय चूक होता की बरोबर? निर्णय घेताना प्रियानं कोणकोणत्या गोष्टींचा विचार केला? त्यातून तिचे कोणते गुणविशेष तुम्हाला जाणवले? घेतलेल्या निर्णयासाठी तिला कोणती किंमत मोजावी लागली?

तुम्हीही स्वत:हून तुमचे काही निर्णय घेतले असतील. त्याबाबतचे तुमचे अनुभव आम्हाला न की वाचायला आवडतील. मग लिहून पाठवणार ना आम्हाला...!

गोवा - पणजी
भाषा - कोकणी, मराठी, स्थापना - ३० मे १९८७


संग्रही ठेवा - **'गीता गीताई'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किं. ₹ १०/-

# कवीजवळ असते...

कवीजवळ असते
असामान्य प्रतिभा
कल्पनेच्या विश्वात वावरायची
त्याला असते मुभा।

कवी असतो
अक्षरांच्या दुनियेतला राजा
त्याच्याजवळ सदा राहतो
काव्यसुमनांचा संभार ताजा ।

कवीजवळ असतो
भावुकपणा नि हळवेपणा
प्रसंगी त्याच्या शब्दांना लाभतो
शिवबाच्या समशेरीचा कणखरपणा ।

कवीजवळ असते ठेव
मायेची, आशेची नि चैतन्याची
किरणे असतात त्याच्याजवळ
उद्याचे उदात्त, समृद्ध राष्ट्र घडवायची ।

कवी हा तर साहित्याचे
मूतिमंत रूपच असतो
'शब्दांवर प्रेम करा'
तळमळीने सांगत असतो ।


एवढे सगळे नाही तर यापेक्षा खूप काही
त्या कवीजवळच असते
कल्पनेच्या बाहेरचेही सर्व
कवीच्या कवितेतून अवतरते।

– **कु. अपूर्वा कारंडे** (इ. ९वी), ९, गुरुकृपा म्युन्सिपल कॉलनीसात रस्ता, सोलापूर

# ते रान...







चिऊने केली गवतांच्या काड्यांची अशी कमाल।
मऊ, सुंदर घरट्यात करायची पिल्लं खूप धमाल।।

दगडविटांच्या साच्यापेक्षा सुगरणीची ती खोपी भारी।
अशा या निसर्गात राहण्याची किमया ही न्यारी।।

पिल्लांच्या चोचीत चिऊ हळूच दाणा द्यायची।
तेव्हा सर्वांची नजर तेथेच खिळून राहायची।।


वसंतात सर्वांनी कोकिळेच्या तानेची वाट पाहायची।
तर पावसाळ्यात सर्वांची स्वारी मोराकडे वळायची।।

नानाविध पक्षी येऊन बसायचे झाडावर।
मंजूळ स्वरांची शाल मोहरायची रानावर।।

– **कु. भार्गवी केन्हाळकर** (इ. ९वी)
बाल शिवाजी माध्यमिक शाळा, जठारपेठ, अकोला
**चित्रकार : चि. तुषार सुपे, चि. आदित्य राऊत**



छत्तीसगढ - रायपूर
भाषा - हिंदी, स्थापना - १ नोव्हेंबर २०००



# गोष्ट एका सुवर्णयुगाची !!

**– कु. देवश्री खरे**

अहो ऽऽ या, या, या! बसा, असे आत या!

आज कसं येणं केलंत?

बरं, बरं, सहजंच आला होतात होय, बसा बसा.

काय म्हणालात? काय करताय?

अहो, आम्ही काय करणार! जरा हे समीकरण सोडवत होतो!

काय म्हणालात? हा फोटो कोणाचा? अहो, हा काय प्रश्न झाला? हेच तर दुर्दैव आहे आपलं... अहो, इतकी थोर परंपरा लाभली आहे आपल्याला गणिताची; पण आपल्याला काही माहीतच नसतं. अहो हे रामानुजन, 'श्रीनिवास रामानुजन'... थोर गणितज्ञ. भारतात गणितातील संशोधन फार प्राचीन काळापासून झालं आहे. जेव्हा इतर देशात गणित विषयातील फारसं संशोधन झालं नव्हतं, तेव्हा आपल्या देशातील ऋषी, महर्षी, प्रज्ञावंत इथं मौलिक संशोधन करीत होते.

भारतातील गणितशास्त्रातील संशोधनाचा प्रारंभ इ. स. पूर्व ३५०० ला झाला आणि अगदी १८ व्या शतकापर्यंत आणि

***इ. स. २०१२ हे भारतीय गणित वर्ष. त्यानिमित्त एक गणितज्ञ आपल्या सगळ्यांशीच 'गप्पा' मारायला आलेत. चला बघू त्यांचं म्हणणं तरी काय आहे ते...***

आजही कमी–जास्त प्रमाणात हे काम सुरूच आहे.


काय म्हणालात, इत या पूर्वीपासून? हो खरंच आहे ते.

बरं का, प्राचीन भारतात आणि मध्यकालीन भारतात गणितातील संशोधन संस्कृत भाषेतून आणि ग्रंथ हे काव्यात्मक स्वरूपात लिहिलेले असत. अहो, इ. स. पूर्व ५०० पर्यंत तर सर्व ज्ञान हे त्यांना मुखोद्गत असे. मग त्यानंतर हस्तलिखितांमार्फत ज्ञानाचा प्रसार होऊ लागला.

अहो, हे ज्ञान पुढील पिढीकडे संक्रमित करण्यासाठी भारतीय लोक विविध पद्धती वापरत असत. जटा पाठ, ध्वज पाठ, घन पाठ अशा काही. यात तेच तेच शब्द परत परत म्हटल्याने ज्ञान पुढील पिढीकडे बदल न होता संक्रमित व्हायचे.

मग जसा जसा गणितातील अवघडपणा वाढत गेला, तसं तसं लिखाण आवश्यक बनलं. तुम्हाला सांगतो, आज असा अंदाज आहे, की भारतात ३ कोटी हस्तलिखिते होती! मग आहे की नाही हा चमत्कार!

अहो, हडप्पा–मोहेंजोदडोची संस्कृती इ. स. पू. २५०० ते इ. स. पू. १७५० या काळात होती असे मानतात. जेव्हा तिथे उत्खनन झाले तेव्हा तिथली नगररचना, घरांची रचना, रस्ते यांच्या पद्धतशीर रचनेतून गणिताचा वापर तर दिसतोच; पण



उत्तरांचल - देहरादून
भाषा - हिंदी, स्थापना - ९ नोव्हेंबर २०००

त्यावेळी बांधकामासाठी वापरल्या गेलेल्या विटांची लांबी, रुंदी, उंची ४ : २ : १ या प्रमाणात होती, जे विटांच्या मजबुतीसाठी अत्यंत उत्तम समजले जाते.

'बापरे!' काय म्हणताय?

पुढचं ऐकून तर चाट पडाल तुम्ही!

अहो, आपण पायथागोरसच्या प्रमेयाला 'पायथागोरसचं प्रमेय' असं म्हणत असलो, तरी त्याच्या आधीच काही वर्षे 'शुल्ब सूत्रे' या ग्रंथात बोधायन महर्षींनी (इ. स. पू. आठवे शतक) हे काटकोन त्रिकोणाच्या कर्णाचे प्रमेय सांगितले होते. त्या बोधायन महर्षींनी दोनच्या वर्गमुळाचे सूत्र तर त्या वेळीच सांगितले होते!

थ क व्हायला झालं ना? होणारच तुम्ही!

तुम्हाला सांगतो इ. स. ४००-१२०० हा काळ भारतीय संशोधनाचा खूपच महत्त्वाचा काळ! अहो, सुवर्णकाळच म्हणा ना! कारण या काळात अनेक थोर लोकं होऊन गेले. त्यांनी गणितशास्त्र, खगोलशास्त्र अशा अनेक विषयांवर संशोधन केले आणि गणितातील अनेक शाखांना दिशा दिली. खगोलशास्त्र म्हटलं की गणित आलंच. त्यामुळे जे गणितज्ञ होते त्यांनी खगोलशास्त्रातही संशोधन केलं आहे. त्याचा प्रसार पुढे आशिया, मध्य पूर्व, युरोप येथेही झाला.


काय म्हणालात, या सगळ्या लोकांबद्दल सांगू? वा, वा बरं वाटलं मला तुमचा उत्साह बघून! ओळीनीच सांगतो तुम्हाला, माझ्याकडे चित्रं देखील आहेत काही जणांची.

हे बघा, हे 'आर्यभट्ट'. (इ. स. चौथे शतक) यांनी 'आर्यभट्टीय' या ग्रंथाची निर्मिती केली. ३३२ श्लोकांतून त्यांनी गणितातील मूलभूत तत्त्वे मांडली. वर्गसमीकरणे, चार दशांश स्थळांपर्यंत पाय ($\pi$) ची किंमत हे सर्वकाही त्यात होते. खगोलशास्त्रातही त्यांनी मोठे काम केले.


हे बघा, हे ब्रह्मगुप्त (इ. स. पाचवे व सहावे शतक) यांनी 'ब्रह्मस्फुटसिद्धांत' नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे पुढे अरबी भाषेत भाषांतरही झाले. त्यांचा हा ग्रंथ जगातला पहिला ग्रंथ, ज्यात 'शून्य' हा एक अंक आहे, असे मांडले होते. शून्याच्या धन व ऋण संख्यांशी होणाऱ्या प्रक्रिया त्यांनी स्पष्ट केल्या. त्यांनी पाय ($\pi$)ची ३ ही व्यवहारात वापरायची व ३.१४ ही अचूक किंमत आहे असेही सांगितले. म्हणजे हेच ते शून्याचा शोध लावणारे तज्ज्ञ.

आणि बरं का, हे 'वराहमिहीर'. (इ. स. सहावे शतक) यांनी गणितविषयक 'पंचसिद्धांत' नावाचा ग्रंथ लिहिला. त्रिकोणमितीतील (Trigonometry) संशोधनात त्यांचा मोठा वाटा आहे.

हे 'श्रीधराचार्य' (इ.स.आठवे व नववे शतक). 'गणितसार', 'ज्योतिर्ज्ञानविधी', 'जातकतिलक' हे त्यांचे ग्रंथ. त्यांनी अंकगणिताच्या क्षेत्रात मोलाचे कार्य केले. अंकगणितीय श्रेढी (Arithmatic Progression) व भूमितीय श्रेढीतील (Geometric Progression) घटकांच्या बेरजांच्या वेगवेगळ्या पद्धती सांगितल्या.





झारखंड - रांची, भाषा - हिंदी, उर्दू, संथाली
स्थापना - १५ नोव्हेंबर २०००

हे ‘महावीर’ (इ. स. नववे शतक), उल्लेखनीय असे जैन गणितज्ञ. त्यांनी संख्याशास्त्रावर ग्रंथ लिहिला. दीर्घवर्तुळाचे (Ellipse) क्षेत्रफळ काढण्यासाठी आणि परिमितीसाठी सूत्रे सांगितली.

हे पाहा, हे ‘भास्कराचार्य’ (इ.स. अकरावे व बारावे शतक). ‘सिद्धांत शिरोमणी’, ‘लीलावती’, ‘बीजगणित,’ ‘गोल अध्याय’, ‘गृह गणित’, ‘कारण कुतूहल’ हे त्यांचे ग्रंथ. अंकगणित क्षेत्रात व्याज मोजण्याच्या पद्धती सांगितल्या त्यांनी. यांनीही पायथागोरसचे प्रमेय सिद्ध केले. कोणत्याही संख्येला शून्याने भागले तर उत्तर अनंत येते. हे त्यांनी सांगितले.

काय म्हणालात? भास्कराचार्यांनी पृथ्वीच्या परिवलन कक्षेची लांबी मोजली. हो-हो बरोबरच आहे ते. तुम्हालाही माहिती दिसतंय की!

हा घ्या, चहा आला.घ्या.

हे पाहा, हे ‘कृष्ण’ (इ. स.सतरावे शतक). त्यांनी भास्कराचार्यांच्या ‘बीजगणित’ या ग्रंथावर ‘बीजनवांकुर’ नावाची टीका तर केलीच, त्याशिवाय ‘छादकनिर्णय’ या स्वतंत्र ग्रंथाची निर्मितीदेखील केली.

आणि हे पण पाहा, अगदी अलीकडचे भारतीय गणितज्ञ, आधी म्हणालो ना ते, ‘श्रीनिवास रामानुजन’. त्यांचा २२ डिसेंबर १८८७ चा जन्म. अहो, निसर्गत: अफाट बुद्धिमत्ता लाभलेले हे तज्ज्ञ. त्यांनी वयाच्या १२ व्या वर्षी त्रिकोणामितीतील पुस्तके वाचून काही प्रमेयांचा शोध लावला. ऑयलरचा नियम परत शोधून काढला. पण दुर्दैवाने १९२० मध्येच त्यांना देवाज्ञा झाली. मात्र या छोट्या आयुष्यात त्यांनी जवळजवळ ३९०० समीकरणे जमवली. त्यांच्या या कार्यामुळे ‘२२ डिसेंबर’ हा त्यांचा जन्मदिवस ‘राष्ट्रीय गणित दिवस’ म्हणून साजरा केला जातो.

काय म्हणता, प्राचीन काळी आपल्या देशात इतकं मूलभूत संशोधन झालं; पण त्याप्रमाणात आता का होताना दिसत नाही?

हां... एकदम सुंदर प्रश्न आहे बरं. अहो, गेली एक हजार वर्ष आपला देश सतत लढतोय. इथे असा एकही प्रांत नाही की जिथे युद्ध झालं नाही.तलवारींच्या ऐवजी पुस्तक हातात कसं धरणार? आणि संशोधन हे शांततेतच होतं. मी तुम्हाला मगाशी म्हणालो ना, त्या सुवर्णकाळाविषयी, त्यावेळी इथे ‘गुप्त’ नावाचे राजे राज्य करीत होते. त्या वेळची भरभराट आणि त्यांनी निर्माण केलेली शांतता यामुळे संशोधन किंवा अभ्यास म्हणा होऊ शकला. पण त्यानंतर मुघल, इंग्रजांनी वाट लावली सगळी.

काय म्हणता, एवढा चिडतोस कशाला?

अहो चिडू नको तर काय करू?

आपली ही संस्कृती इतकी महान! अध्यात्माच्या आधाराने इथे शांतपणे संशोधन झालं. पण ती परंपरा काही आपल्याला टिकवता आली नाही. आता सगळे पैशाच्या मागे! बहुतेक फारसा कोणाला संशोधनात रस नाही. अजून काय सांगू तुम्हाला? आहे हे असं आहे.

काय म्हणालात? निघताय? खूप झालं का आज? बरं चला परत भेटूच. पुन्हा आलात की आणखी काही तज्ज्ञांबद्दल सांगेन!

काय म्हणताय? यादी संपली नाही अजून?

अहो! एवढ्यात कशी संपेल? हे तर मला माहीत होते ते तज्ज्ञ झाले, अजून कात्यायन, वीरसेन, कृपाराम, जगन्नाथ आणि असे अनेक आहेतच की ! ही यादी तर वाढतच जाणार आहे, तुम्ही कधी परत येताय ते सांगा! मी तुमची वाट बघतोय!!

***


**- कु. देवश्री खरे (इ. ११ वी)**
उमाकांत' २० विवेक सहनिवास
पद्मावती पुणे 411009
**चित्रकार : चि. ओंकार जरांडे**


**संदर्भ** – इंटरनेट (विकिपिडिया), पाठ्यपुस्तके आणि इतर संदर्भ ग्रंथ

जलतीर्थे : ठोसघर धबधबा - ठोसघर, जि. सातारा
अतिशय सुंदर धबधब्यांची शृंखला, काळ - जुलै ते नोव्हेंबर

# प्रिय ताईंस...

– कु. जपा फडके



वंदनीय ताईंस,
शि. सा. न. वि. वि.

मी तुमची एक विद्यार्थिनी आज तुमच्याशी पत्ररूपी संवाद साधत आहे. आज मी ज्या ठिकाणी उभी आहे, त्याचे सर्व श्रेय केवळ तुम्ही दिलेल्या संस्कारांना जाते. तुमच्याशी जितके बोलावे तितके थोडेच! गेली अनेक वर्षं आपल्या विद्यार्थ्यांना घडवण्यात तुम्ही रमलेल्या आहात. तुमचा ज्ञानरूपी वसा सर्वांपर्यंत पोहोचावा यासाठी तुम्ही खूप प्रयत्न केलेत. आजही करत आहात. ते तुमचे प्रयत्न खऱ्या अर्थाने यशस्वी ठरत आहेत असे आज वाटते.

तुमची एक एक शिकवण मी माझ्या मनात बिंबवून ठेवली आहे. 'शिष्याची अंत:करणे ओळखतो तोच खरा गुरू' हे सुवचन तुमच्या बाबतीत खरोखर लागू पडते. कोण कशात कमी आहे, कोणाला कशाची गरज आहे हे जाणून तुम्ही त्या विद्यार्थ्यांत योग्य वेळी योग्य ती सुधारणा केलीत. 'शिकवलेले नुसते पाठ न करता समजून घ्या, संतांचे अभंग केवळ घोकंपट्टी न करता ते आचरणात आणा', ही शिकवण तुम्ही दिलीत. पुस्तक वाचनाची गोडी लागण्यासाठी तुम्ही ग्रंथालयात अप्रतिम अशी पुस्तके ठेवलीत. एवढ्यावरच न थांबता 'वाचकवीर' योजना सुरू केलीत. प्रत्येक इयत्तेने ठरवून दिलेल्या पानांचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या मुलांना बक्षिसे! किती सहजतेने तुम्ही पुस्तकांना आमच्या आयुष्यात जिव्हाळ्याचं स्थान मिळवून दिलंत. तुम्ही लावलेली ती नोंदवहीची सवय अजूनही गेलेली नाही.

वेळेचा योग्य वापर करण्याचे तंत्र तुम्ही आम्हाला शिकवलेत. तुमच्या नेहमी बोलण्यात असलेली वा यं अजूनही स्पष्टपणे आठवतात. तुम्ही नेहमी म्हणायचात,

Save seconds,
seconds save minutes
Minutes save hours,
hours save days
Days save weeks,
weeks save months
Months save years and
hence one can save life.

जगातील सर्व पैसे देऊनही गेलेला एक क्षण परत मिळवला जाऊ शकत नाही हे तुम्ही नेहमी सांगायचात.

अनेक स्पर्धा-परीक्षांच्या माध्यमांतून तुम्ही आमच्या

***ताई, तुम्ही 'कोण कशात कमी पडते' हे जाणून आमच्या मनात योग्य ते संस्कार रुजवलेत आणि आम्हाला यशाच्या मार्गावर पोहोचवलेत. त्याबद्दल हे छोटेसे कृतज्ञतापत्र...***

जलतीर्थ : वर्धा धरण (वर्धा नदी) - ता. मोर्शी, जि. अमरावती
बांधणी - १९९३, उंची - ४६.२ मी.


संग्रही ठेवा - कथासंग्रह-'**दरवळ**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ४०/-

कलागुणांना वाव दिलात. अनेक थोर कवींच्या कविता, लेखकांचे पाठ सतत वाचनात ठेवण्यास सांगितले. त्यामुळे सतत ज्ञानात भर पडून सामान्यज्ञान वाढण्यास मोठी मदत झाली.

तुम्हाला आठवतं ना मी एका व  तृत्व स्पर्धेत भाषण देताना खूप घाबरले होते. त्यावेळी इतके लोक होते की, मला त्यांच्यासमोर बोलताच आले नाही. नंतर मात्र मी अगदी खचून गेले. 'पुढे कधीच बोलायचे नाही' असे मला वाटायला लागले. पण त्यावेळी जेव्हा मला कुणाच्या तरी आधाराची गरज वाटत होती तेव्हा तुम्ही मला सावरलेत. तुम्ही मला उदाहरण देताना सांगितले होते की, आज महान व  ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आचार्य अत्र्यांचाही पहिल्या भाषणात 'त-त-प-प' झालेच होते; पण अफाट प्रयत्नांनी त्यांनी भाषेवर अद्‌भुत असे प्रभुत्व मिळविले. वाचन आणि सभाधीटपणा यांच्या जोरावर तूही हे न  कीच करू शकतेस. रोज सभागृहात ज्यांचे वाढदिवस आहेत त्यांना शुभेच्छा देण्याचे काम तुम्ही मला दिलेत आणि माझी भीती हळूहळू कुठल्या कुठे पळून गेली.

'अपयशाने कधीही खचून जाऊ नका' हे तुम्हीच शिकवलेत. 'अपयश जितके जास्त तितके पुढे मिळणारे यश मोठे' असं सांगून दिलासा देणाऱ्या तुम्हीच होतात. अपयशात सर्वांनी पाठ फिरवली; पण तुम्ही मात्र माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिलात. त्यावेळी तुम्ही म्हणाला होतात,

Yesterday is
a cancelled cheque,
Tomorrow is
a promissory note,
Today is ready cash. Use it !

सुरुवातीला अपयश आलेल्या पण पुढे यशस्वी झालेल्या लोकांची उदाहरणे सांगून तुम्ही मला मोठा दिलासा दिलात.

'प्रत्येक चुकीतून काहीतरी शिकून पुढे जा तरच यश तुमचे होईल', हा मूलमंत्र तुम्ही दिलात. तेव्हा तुम्ही सांगितलेली गोष्ट मला आजही आठवते. एका शास्त्रज्ञाकडे एक मांजर आणि तीन पिल्ले होती. तेव्हा त्याने त्यांच्यासाठी एक घर बांधले आणि त्याला दोन वाटा केल्या. मोठे छिद्र मोठ्या मांजराला आणि छोटे छिद्र पिल्लांना ! पण नंतर त्याच्या लक्षात आले की, सर्व मांजरे मोठ्या छिद्रातूनच ये-जा करत आहेत. त्याला त्याची चूक कळली आणि त्याने त्यात सुधारणा केली.

'झाड तोडण्यासाठी आठ तास असले तर त्यातले सहा तास कुऱ्हाडीला धार लावण्यात घालवा', असे तुम्ही नेहमी सांगायचात. यासारखे अनेक मोलाचे विचार सांगून तुम्ही आमच्या मनाला योग्य दिशेने वळविलेत.

देशाबद्‌दलचा अभिमान हा तुमच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय होता. अनेक देशभ  तांनी आपल्या सुखी संसाराची होळी करून स्वातंत्र्याची गुढी उभारली व राष्ट्राचा संसार उभा केला. त्यांना विसरणे म्हणजे पापच ! असे तुम्ही म्हणायचात.

हे राष्ट्र देवतांचे,
हे राष्ट्र प्रेषितांचे,
आचंद्र-सूर्य नांदो,
स्वातंत्र्य भारताचे !

यांसारख्या अनेक कविता तुम्ही आमच्या मनात ठसवल्यात.

जाताना प्रत्येकाच्या हातात आठवण म्हणून तुम्ही पुस्तके दिलीत. त्याच्यावरच्या त्या चार ओळी प्रगतीला जणू वाचा फोडणाऱ्या आहेत.

घे भरारी आकाशी
जा मु  त दिगंतरी
कर्तृत्वाचा आलेख
पसरू दे दिशांतरी ।

तुमच्यासारख्या 'आकाशा पलीकडचे पाहणाऱ्या, आजच्या शिक्षण पद्धतीला आव्हान देणाऱ्या, भ्रष्टाचाराला न जुमानणाऱ्या' शिक्षिका फारच कमी आहेत; पण ताई, तुम्ही घडविलेले विद्यार्थी जेव्हा दाही दिशांना जातील, तेव्हा आपल्या आयुष्याचं सार्थक झाले, असं तुम्हाला न  कीच वाटेल.

***

**– कु. जपा फडके**
ऑर्चिड सुविधा, फ्लॅट नं. ४
सेंट उर्सुला शाळेजवळ,
आकुर्डी, पुणे 411035
**चित्रकार : कु. पल्लवी गाडगीळ**

जलतीर्थे : वैतरणा धरण (वैतरणा नदी) - इगतपुरी, जि. नाशिक
बांधणी - १९७३, उंची - ४१ मी.

मी लहान असल्यापासून 'छात्र प्रबोधन' अंकाशी माझी ओळख झाली. लहानपणी आई तो वाचून दाखवायची, आता मी स्वत: वाचते. 'छात्र प्रबोधन' अंकाचं वैशिष्ट्य म्हणजे ते ६ दिवाळी अंक काढतात. या अंकांची मुखपृष्ठंसुद्धा खूप आकर्षक आणि सुंदर असतात, ती चित्रं पाहून स्वत:देखील चित्र काढावंसं वाटतं. ह्या मासिकांच्या संपादकांशी म्हणजे महेन्द्रभाईंशी आपण केव्हाही मोकळेपणाने बोलू शकतो. मी तर अंकातील गोष्टी वाचून त्यावर त्यांना पत्रंही लिहिली आहेत.

**- विभा बापट** (इ. ७ वी), ज्ञान प्रबोधिनी प्रशाला पुणे, विद्यार्थी वाचक

मला आठवतंय जेव्हा मी दुसरीत होतो तेव्हा मला मराठी बाराखडी, मूळाक्षरांची नीट ओळखदेखील नसल्याने मराठी वाचणे व लिहिणे टाळण्याचा मी प्रयत्न करीत असे. आईने 'छात्र प्रबोधन'चे आजीवन सभासदत्व घेतले. तेव्हा रोज आई मला 'छात्र प्रबोधन'मधील एक भाग वाचून दाखवी. हळूहळू आपण स्वत: वाचावे असेही वाटू लागले. मी सगळेच 'छात्र प्रबोधन'चे अंक सांभाळून ठेवलेले आहेत. त्यामुळे कधीही कोणताही अंक परत परत काढून वाचता येतो. अंकाचे संपादक महेन्द्र सेठिया सरांचा संवाद वाचताना कधी कधी आश्चर्य वाटते; 'यांना कसं माझ्या मनातलं समजतं?' त्यांनी अंकात सुचवल्याप्रमाणे स्वत:मध्ये बदल करण्याचा प्रयत्न करतो आहे.

**- शंतनू कुलकर्णी**, (७ वी) एस. पी. एम. इंग्रजी माध्यम शाळा, पुणे ३० - विद्यार्थी वाचक

# माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

## छात्र प्रबोधन २० वर्षांची वाटचाल

माझं वय जेवढं, तेवढंच खरंतर छात्र प्रबोधनचंसुद्धा वय आहे. त्यामुळे सुरुवातीला फ त वाचक असले तरी नंतर मासिकाव्यतिरि त विभागाशीसुद्धा माझा संबंध हळूहळू वाढत गेला. वाचक म्हणून मी छात्र प्रबोधनमुळे जितकी समृद्ध झाले तेवढीच आता विभागात होते आहे. विद्यार्थी विशेषांकाचं काम करायची संधी मिळाली तेव्हा मी अकरावीत होते. इत या लहान वयात आपल्यावर एवढा विश्वास दाखवला जाणं तेव्हा खूप भारी वाटलं होतं, यापुढेही छात्र प्रबोधनबरोबरीने मला कायम समृद्ध होत राहायला आवडेल.

**- मीरा शेटे,** युवा वाचक - पुणे

मी खूप लहान असल्यापासून कदाचित मला वाचताही येत नव्हतं तेव्हापासून आमच्या घरी 'छात्र प्रबोधन' हे मासिक येत आहे. दिवसांचा कार्यक्रम असायचा. शाळेतल्या पाठ्यपुस्तकांव्यतिरि त 'अवांतर वाचन' म्हणजे 'छात्र प्रबोधन'च होतं. अंकातल्या कथा, ललित, माहितीपर लेख मला नेहमीच आवडतात. छात्र प्रबोधनमधून फ त चांगलं साहित्य वाचायला मिळतं एवढ्यापुरतं हे मासिक मर्यादित नाही. तर छात्र प्रबोधनतर्फे मुलांमुलींसाठी वेगवेगळ्या विषयांवरील शिबिरं, मेळावे, 'तुम्हीच संपादक व्हा', 'ध्वनिफीत स्पर्धा', 'सृजनाला पंख नवे' यांसारख्या अभिनव स्पर्धा, गिरिभ्रमण सहली असे विविध उपक्रम राबविले जातात. या सर्व उपक्रमांमधून आपल्याला समृद्ध करणारे, आपल्यात लपलेल्या क्षमता वाढवणारे अनुभव घेता येतात. नवीन गोष्टी शिकायला मिळतात... विचारांना वेगळी दिशा मिळते अणि या सर्वांसाठी मला 'छात्र प्रबोधन' खूप आवडते

**- सुमेध फाटक,** युवा वाचक - डोंबिवली

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० अग्रहायण, शके १९३४, १ डिसेंबर २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.


संग्रही ठेवा - **'असे घटते सुंदर अक्षर'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. १५/-

# कथा ही विवेकानंदाची

कथा ही भारतरत्नाची ।
बंग देशीच्या पवित्र भूच्या गंगापुत्राची ।।धृ।।

अध्यात्माच्या वेलीवरली ज्ञान-भ तीची फुले उमलली
वेदांमधल्या सहिष्णुतेची, सहानुभावाची ।। १।।

भुवनेश्वरीच्या उदरामधले संस्कारांचे बीज प्रकटले ।
चला गाऊया जीवनगाथा नरेन्द्रदत्ताची ।। २।।

पूर्व-पश्चिम भिन्न संस्कृती भिन्न भिन्न ही नीती-नाती ।
त्याच्यामध्ये फुंकर घाली विश्वबंधुतेची ।।३।।

विवेक आनंदाची स्मरणे त्यातून घ्यावी अभिनव स्फुरणे ।
देशभ तीची, संतकुळीची, माणूस धर्माची ।। ४।।

– कै. रवींद्र भट



स्वामी विवेकानंद
शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला -१०

*स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणूया!... १०*

तुमच्याकडे मदत मागणाऱ्याला यथाश ती शुद्ध अंत:करणाने मदत करा. यालाच 'कर्म' म्हणतात.

- अडचणीत असणाऱ्या माझ्या मित्रमैत्रिणींना, त्यांच्याकडून कसलीही अपेक्षा न ठेवता, मी तत्परतेने मदत करेन.

लक्षात आहे ना !

## 'छात्र प्रबोधन'द्वारा आयोजित नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय स्पर्धा
## 'तुम्हीच संपादक व्हा !'
## राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा : २०१२-१३ (पृष्ठमर्यादा ४८ ते ५४)

**स्पर्धेचे तपशील –** • स्पर्धा इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. • स्पर्धा सांघिक असून त्यासाठी ५ ते ८ जणांचा गट असावा. • स्पर्धेत प्रवेश नि:शुल्क आहे. तथापि **३१ डिसेंबर २०१२** पर्यंत पत्राद्वारा/ई-मेलद्वारा नावनोंदणी आवश्यक आहे. नोंदणीपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळाला (www.chhatraprabodhan.org) जरूर भेट द्या वा मुख्य कार्यालयाशी संपर्क साधा.

**हस्तलिखिते पाठविण्याचा अंतिम दिनांक – ५ फेब्रुवारी २०१३**

**• खालील विषयांचा समावेश हस्तलिखितात असणे आवश्यक आहे.**

**१. प्रतिभाशाली लेखन –** अ) गुप्त संदेश कविता * आ) कल्पनाप्रधान गोष्ट * इ) निर्जीव वस्तूंमधला संवाद

**२. कल्पक विचार –** नित्य वापरातल्या कोणत्याही वस्तूमध्ये ५० सुधारणा सुचवा *

**३. कला –** कोलाज तयार करून चिकटवा*

**४. मुलाखत –** आपल्या परिसरातील एका उद्योजकाची मुलाखत*


**५. वर्षविशेष –**१) राष्ट्रीय गणित वर्षानिमित्ताने एका गणितज्ज्ञाचा थोड यात परिचय २) स्वामी विवेकानंदांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कोणत्याही एका विचाराचे रसग्रहण/विवेचन/उदाहरणांसह स्पष्टीकरण • वरीलपैकी * अशी खूण केलेल्या साहित्य प्रकारासाठी उपयु त तंत्रे सहभागी सदस्यांना 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळावर पाहता येईल.

• **बक्षिसे – प्रथम –** रु. १०००, **द्वितीय –** रु. ८००, **तृतीय –** रु. ६००, **उत्तेजनार्थ तीन बक्षीसे –** रु. ३००(प्रत्येकी)

**सौर अग्रहायण, शके १९३४/डिसेंबर २०१२, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan**
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

## कुमारांच्या कुंचल्यातून...

१


२


३


**१. चि. श्रीपाद देशपांडे, अकोला  २. कु. शलाका आहाळे, अकोला**
**३. कु. अपूर्वा देव, पुणे**

**सौर दिनदर्शिका शके १९३४**

| | डिसेंबर २०१२ | अग्रहायण /पौष |
|---|---|---|
| श. | 1 | १० |
| र. | 2 | ११ |
| सो. | 3 | १२ |
| मं. | 4 | १३ |
| बु. | 5 | १४ |
| गु. | 6 | १५ |
| शु. | 7 | १६ |
| श. | 8 | १७ |
| र. | 9 | १८ |
| सो. | 10 | १९ |
| मं. | 11 | २० |
| बु. | 12 | २१ |
| गु. | 13 | २२ |
| शु. | 14 | २३ |
| श. | 15 | २४ |
| र. | 16 | २५ |
| सो. | 17 | २६ |
| मं. | 18 | २७ |
| बु. | 19 | २८ |
| गु. | 20 | २९ |
| शु. | 21 | ३० |
| श. | 22 | पौ.१ |
| र. | 23 | २ |
| सो. | 24 | ३ |
| मं. | 25 | ४ |
| बु. | 26 | ५ |
| गु. | 27 | ६ |
| शु. | 28 | ७ |
| श. | 29 | ८ |
| र. | 30 | ९ |
| सो. | 31 | १० |

**पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 13-3/Dec. 12 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**या अंकाची किंमत : ₹ १५/–**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–**
**प्रकाशन दिनांक :**
सौर १० अग्रहायण, शके १९३४
१ डिसेंबर २०१२
**www.chhatraprabodhan.org**
**ई-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाड या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

**प्रति –**